बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ५१ | बुधवार, दि.२७ नोव्हेंबर २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

महाराष्ट्र विधानसभेच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच गोंदियात कमल फुलले

गोंदिया:- महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेच्या १५ व्या सार्वत्रिक निवडणूकीच्या मतदानाची मतगणना (दि.२३) झाली असून गोंदिया विधानसभा मतदारसंघात ६२ वर्षानंतर पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाला विजय मिळत कमल फुलला आहे. या मतदारसंघात पहिल्यांदा कमल फुलल्याने भाजपच्या कार्यकर्त्यामध्ये उत्साह संचारल्याचे चित्र बघावयास मिळाले. मतमोजणीला सकाळी सुरवात होताच सकाळपासूनच भाजप महायुतीचे उमेदवार विनोद संतोष अग्रवाल यांनी आघाडी घेतली होती.ती आघाडी काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार गोपालदास अग्रवाल यांना मोडता आली नाही.उलट प्रत्येक फेरील भाजप उमेदवारांने आघाडी घेत आपला विजयाचा मार्ग सुकर केला.

विनोद अग्रवाल हे विजयाची जशीजशी घोडदौड करीत होते,तस तसे कार्यकर्त्यामध्ये उत्साह दिसून येत होता.आमदार अग्रवाल यांच्या कार्यालय व निवासस्थानासमोर जमलेल्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला.तर विजयाचीखात्री पटल्यानंतर आमदार विनोद अग्रवाल यांनी आपल्या मातोश्रीचे दर्शन घेत आशिर्वाद घेतला.

महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच विधानसभेपासून गोंदिया विधानसभा मतदारसंघ अस्त्विात आला.या मतदारसंघाच्या स्थापनेपासून आतापर्यंत १४ सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या आहेत. यात काँग्रेसने ११ वेळा तर दोनदा शिवसेनेने आणि गेल्या निवडणुकीत अपक्षाने विजय प्राप्त करुन या मतदारसंघात इतिहास रचला होता.त्यामुळेच हा मतदारसंघ काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो.सन २०१९च्या निवडणुकीत काँग्रेसचा हा बालेकिल्ला अपक्ष उमेदवाराने भेदला होता.आता २०२४ च्या निवडणूकीत अपक्ष आमदार विनोद अग्रवाल हे भाजप महायुतीकडून रिंगणात उतरत भाजपचा कमल या मतदारसंघात फुलवण्याचा इतिहास आपल्या नावे नोंदवला आहे.

गोंदिया विधानसभा क्षेत्रावर काँग्रेसचे वर्चस्व होते.त्यानंतर १९९५ आणि १९९९ च्या निवडणुकीत काँग्रेसचा बालेकिल्ला भेदण्यास विरोधकांना यश आले. युतीच्या माध्यमातून शिवसेनेचे रमेश कुथे यानी दोनदा या मतदारसंघातून विजय मिळवला होता. मात्र त्यानंतरच्या निवडणुकीत काँग्रेसने पुन्हा आपले वर्चस्व स्थापन केले.

या मतदारसंघात सन १९६७ पासून भारतीय जनसंघ, जनता पार्टी व आताचा भाजप पक्ष काँग्रेसला आव्हान देत होता.मात्र या मतदारसंघाचा इतिहास पाहता एकदाही भाजपच्या नावावर विजयाची नोंद या ६२ वर्षात झाली नव्हती ती या २०२४ च्या निवडणूकीत झाली आहे.

नव्या सरकारच्या शपथविधीची तारीख ठरली! कधी होणार?

मुंबई- राज्यात सत्तास्थापनेच्या घडामोडींना प्रचंड वेग आला आहे. अशातच आज एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे आता राज्याचा नवा मुख्यमंत्री कोण होणार याकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. परंतुआता महायुतीकडून मुख्यमंत्रिपदासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची दाट शक्यता वर्तवली आहे.

शपथविधी कधी पार पडणार : यावेळी मुख्यमंत्र्यांसोबतच भाजपचे १० आमदार, शिवसेना शिंदे गट ६ आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ४ आमदार मंत्रिपदाची शपथ घेणार असल्याची देखील सर्वत्र चर्चा रंगली आहे. मात्र आता राज्य सरकारचा नवा शपथविधी कधी पार पडणार याची तारीख देखील समोर आली आहे.

यासंदर्भात भाजप नेते रावसाहेब दानवे यांनी महाराष्ट्रच्या नव्या सरकारचा शपथविधी कधी पार पडणार याबद्दल माहिती दिली आहे. येत्या ३० तारखेला नव्या सरकारचा शपथविधी पार पडणार असल्याचं रावसाहेब दानवे म्हणाले आहेत.

महायुतीमधील भाजपसह इतर पक्षांचे नेते व कार्यकर्ते यांना त्यांच्या पक्षाचा मुख्यमंत्री व्हावा असे वाटत आहे.

परंतु, आपल्या पक्षाचा मुख्यमंत्री का होऊ नये अशी प्रत्येक पक्षाची देखील भावना असते. त्यामुळे सर्वजण मुख्यमंत्री पदाची मागणी करत आहेत. तसेच एकनाथ शिंदे हे महायुतीत नाराज असल्याच्या अफवा असल्याचं रावसाहेब दानवे म्हणाले आहेत.

तसेच मुख्यमंत्रिपदाचा आणि मंत्रिपदाचा फॉर्म्युला देखील एकत्रित बसून ठरवला जाईल असे रावसाहेब दानवे यांनी म्हटले आहे. सर्वात विशेष म्हणजे मुख्यमंत्र्यांसोबत महायुतीतील २० आमदार मंत्रिपदाची शपथ घेणार असल्याचं बोललं जात आहे.

विदर्भातील १२ आमदारांना मतदारांनी नाकारले

गोंदिया: विदर्भातील ६२ जागांपैकी तब्बल ४१ जागांवर महायुतीने विजय मिळवून महाविकास आघाडीला जोरदार झटका दिला. विजयाच्या या लाटेत विदर्भातील १२ आमदारांनाही मतदारांना नाकारले आहे. त्यामध्ये पाच आमदार महायुतीचे आहेत हे विशेष.

चंद्रपूरच्या राजुऱ्यात काँग्रेसचे आमदार सुभाष धोटे व स्वभापचे ॲड.वामनराव चटप यांच्यात विजयासाठी झुंज सुरु असतानाच भाजपचे देवराव भोंग़ळे यांनी आघाडी घेत विजयावर शिक्कामोर्तब करुन आश्चर्याचा धक्का दिसला त्यांनी विद्यमान आमदार धोटे यांचा केलेला पराभव चांगलाच चर्चेत आला आहे. अमरावतीच्या तिवसा मतदारसंघात भाजपचे राजेश वानखडे व काँग्रेसच्या आमदार यशोमती ठाकूर यांच्यात काट्याची लढत झाली. मात्र वानखडे यांनी पहिल्या फेरीपासून आघाडी कायम ठेवत ठाकूर यांना पराभूत केले.



अचलपूर मतदारसंघात चार वेळा विजयी झालेले माजी राज्यमंत्री आ.बच्चू कडू यांचा भाजपचे प्रवीण तायडे यांनी १२१३१ मतांनी पराभव केला. मेळघाट मतदारसंघात भाजपचे उमेदवार व माजी आमदार केवलराम काळे यांनी उच्चांकी १,४६,९७८ मते घेत काँग्रेसचे उमेदवार डॉ.हेमंत चिमोटे यांचा पराभव केला. येथे प्रहारचे आमदार राजकुमार पटेल यांना २५२८१ मते मिळाली ते तिसऱ्या क्रमांकावर राहिले. वर्धेतील देवळी विधानसभा मतदारसंघात सलग २५ वर्षापासून असलेल्या काँग्रेसच्या बालेकिल्ल्याला भाजपचे राजेश बकाने यांनी अखेर खिंडार पाडले. त्यांनी काँग्रेसचे विद्यमान अमदार व माजी मंत्री रणजित कांबळे यांचा पराभूत केले. मलकापूर मतदारसंघात भाजपचे माजी आमदार चैनसुख संचेती यांनी २०१९ च्या पराभवाचा वचपा काढत काँग्रेसचे आमदार राजेश एकडे यांचा पराभव केला. सिंदखेड राजात नवख्या मनोज कायंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे डॉ.राजेंद्र शिंगणे यांचा पराभव केला. विशेष म्हणजे देवेंद्र भुयार व राजकुमार पटेल यांचे डिपॉझिटही वाचले नाही.

महायुतीच्या आमदारांनाही दिला झटका

❍विदर्भात महाविकास आघाडीची वाताहत होत असतानाच यवतमाळमध्ये भाजपचे माजी मंत्री विद्यमान आमदार मदन येरावार यांना काँग्रेसचे बाळासाहेब मांगूळकर यांनी पराभूत करुन यवतमाळमध्ये महायुतीला रोखले. २०१९ च्या निवडणुकीत अवघ्या २२५३ मतांनी झालेल्या पराभवाचा मांगुळकर यांची वचपा काढला.

❍वणी मतदारसंघात उध्दवसेनेचे संजय देरकर यांनी दोन टर्म आमदार राहिलेले भाजपचे संजीव रेड्डी बोदकुरवार यांना १५ हजार ५३० मताधिक्याने पराभूत केले.

❍मेहकरमध्ये सिद्धार्थ खरत यांनी तीन वेळा आमदार असलेले शिवसेनेचे डॉ. संजय रायमुलकर यांचा पराभव करुन प्रतापगडाला खिंडार पाडले.

❍गडचिरोलीच्या आरमोरीत काँग्रेसने भाजपचे पानिपत केले. तेथे विद्यमान आमदार कृष्णा गजबे यांना काँग्रेसचे रामदास मसराम यांनी मात दिली. तब्बल दहा वर्षानंतर आरमोरीचा गड काँग्रेसने भाजपकडून हिसकावून घेतला.

❍मोर्शी मतदारसंघात मैत्रीपूर्ण लढतीत भाजपचे उमेश यालवकर विजयी झाले. त्यांनी अजित पवार गटाचे आमदार देवेंद्र भुयार यांचा पराभव केला.

या ७ आमदारांना उमेदवारी नव्हती

सात आमदारांना भाजपने उमेदवारी नाकारली होती. त्यामध्ये कामठीचे टेकचं सावरकर, आर्णीचे संदीप धुर्वे, उमरखेडचे नामदेव ससाणे, आर्वीचे दादाराव केंचे, गडचिरोलीचे डॉ. देवराव होळी, नागपूर मध्यमधील विकास कुंभारे, वाशिमचे लखन मलिक यांचा समावेश होता. त्यामुळे हे आमदार रिंगणात नव्हते. या आमदाराची समजूत काढत बंडखोरी टाळली. अकोला पश्चिमचे आमदार गोवर्धन शर्मा व कारंजाचे आमदार राजेंद्र पाटणी यांचे निधन झाले. कारंजा पुन्हा भाजपने जिंकले. अकोला पश्चिममध्ये काँग्रेसचा ३० वर्षानंतर विजय झाला.

पटोले यांच्याबद्दल अपशब्द, शिवीगाळ; व्हायरल ऑडियो क्लिपने खळबळ

भंडारा-साकोली विधानसभा मतदारसंघात लागलेल्या निकालानंतर या मतदारसंघातील वातावरण तापलेले आहे. साकोलीचे नवनिर्वाचित आमदार नाना पटोले यांच्याबद्दल बोलताना अपशब्दांचा वापर करत थेट मोबाईल वरून शिवीगाळ करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली. भाजपचे जिल्हाध्यक्ष आणि राष्ट्रवादीचे एक नगरसेवक यांच्यात झालेल्या या संवादाची कॉल रेकॉर्डिंग व्हायरल झाली असून यासंदर्भात काँग्रेस पदाधिकाऱ्यांकडून लाखनी पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली आहे.

साकोली विधानसभेची निवडणूक अत्यंत अटीतटीची झाली. निकालानंतर येथील वातावरण तापलेले असताना एक ऑडियो क्लिप व्हायरल झाली ज्यामुळे चर्चेला उधाण आले आहे. राष्ट्रवादी (अजित पवार) गटाचे लाखनी नगरपंचायतीचे स्वीकृत नगरसेवक धनु व्यास यांनी भाजप भंडारा जिल्हाध्यक्ष यांच्याशी मोबाईलवर संवाद करतांना आमदार पटोले यांच्याबद्दल मोबाईलवर अपशब्दात शिवीगाळ केली.

नगरसेवक धनु व्यास यांनी भाजपा जिल्हाध्यक्ष यांना शनिवारी २३ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या सुमारास भ्रमनध्वनीवर संपर्क साधला होता. यावेळी जिल्हा अध्यक्ष यांनी विधानसभा निवडणुकीत नाना पटोले निवडून आल्यामुळे त्यांचे अभिनंदन करायला हवे असे बोलणे सूरू असताना मोबाईल फोनवर आमदार पटोलेबद्दल नगरसेवक व्यास यांनी अपमानजनक अश्लील भाषेचा वापर करीत शिवीगाळ केली. या फोनवरील संभाषणाची ऑडियो क्लिप समाज माध्यमावर मोठ्यप्रमाणावर व्हायरल झाली आहे. या प्रकारामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

या घटनेची दखल घेत, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष योगराज झलके यांच्या मार्गदर्शनात शंभरहुन अधिक कार्यकर्त्यांनी (दि.२५) नोव्हेंबर रोजी लाखनी पोलिस ठाण्यात धनु व्यास यांचे विरोधात तक्रार दिली आहे. अश्लील संवादामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांच्या भावना दुखावल्या असून, संपूर्ण राज्यात मोबाईलची कॉल रेकॉर्डिंग वायरल झाली आहे. एकंदरीत,आमदार नाना पटोले यांची प्रतिमा मलीन करण्याचा हा डाव तर नाही ना? असा सवाल जनतेत उपस्थित केल्या जात आहे. शिवीगाळ करणाऱ्या नगरसेवक धनु व्यास यांचेवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी काँगेस पक्षाकडून तक्रारीद्वारे करण्यात आली आहे.

बाराभाटी येथे धानाचे पुंजणे जळाले

अर्जुनी मोर.-तालुक्यातील बाराभाटी शेत शिवारातील रमणलाल चांडक यांचे शेतातील दोन धानाचे पुंजणे अज्ञात व्यक्तींनी लावलेल्या आगीत जळून खाक झाले असून सदर शेतकऱ्यांचे साडेतीन लाख रुपये चे नुकसान झाल्याची घटना २६ नोव्हेंबर रोजी पहाटे दरम्यान घडली.रमणलाल चांडक यांची बाराभाटी येथे गट क्रं. ५५३ क्षेत्र ३.७१ हेक्टर आर,गट क्रं. ५७९ छेत्र ०. ४० हेक्टर आर ,गट क्रमांक ६४९ क्षेत्र ०. २० हेक्टर आर वर्णनाची शेती आहे. सदर शेती ठेका पद्धतीने बाराभाटी येथील किशोर बेलखोडे, महेश बेलखोडे, व भोजराज बेलखोडे हे बंधू सदर शेती करतात. यावर्षी खरीप हंगामाची फसल ब्र्यापैकी आहे. धनाची कापणी करून त्यांनी मळणीसाठी शेतातील बांधावरच पूजने करून ठेवले होते.

विधानसभेनंतर आता मिशन नगर परिषद

इच्छुक लागले कामाला, विजयाने महायुतीत उत्साह, महाविकास आघाडीत कसे येणार चैतन्य

गोंदिया: विधानसभा निवडणुकीत महायुतीने जिल्ह्यात विजयाचा चौकार मारल्याने महायुतीतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या निवडणुका पार पडल्यानंतर आता सर्वांनीच मिशन नगर परिषद आणि नगरपंचायत सुरु केले आहे. जिल्ह्यातील गोंदिया, तिरोडा, आमगाव या नगर परिषद तर गोरेगाव, सालेकसा या नगर पंचायतीच्या निवडणूका गेल्या दोन वर्षापासून रखडल्या आहे. राज्यात विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या यशानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे इच्छुकांनी त्यासाठी मोर्चेबांधणी सुरु केली आहे.

महायुती सरकारने महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत नेत्रदीपक यश प्राप्त केले. त्यामुळे महायुतीतील घटक पक्षांचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यामुळे या अनुकूल वातावरणाचा फायदा घेण्याच्या मनस्थितीत महायुती सरकार आहे.

गेल्या दोन वर्षापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका रखडल्या आहेत. गोंदिया, तिरोडा, आमगाव नगर परिषदेत प्रशासकराज सुरु आहे. परिणामी विकासकामांना खीळ बसली आहे. तर या निवडणूक लांबणीवर गेल्याने सरकारवर टीका टिप्पणी सुद्धा होत आहे. याच वर्षी लोकसभा निवडणूक झाली. लगेच सहा महिन्यांनी विधानसभा निवडणूका पार पडल्या. लोकसभेत समाधानकारक यश न मिळाल्याने महायुती सरकारमध्ये थोडे नैराश्य होते. पण विधानसभा निवडणुकीतील अभूतपूर्व यशामुळे महायुतीत उत्साह संचारला आहे.

इच्छुक स्थानिक नेत्यांच्या संपर्कात

नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूक लढण्यास इच्छुक असणाऱ्यांनी आतापासूनच त्यासाठी आपल्या पक्षाच्या स्थानिक नेत्यांकडे फिल्डींग लावण्यास सुरुवात केली आहे. आमदार, स्थानिक प्रमुख पदाधिकारी यांच्या भेटीगाठी घेऊन आपल्याकडे लक्ष असून देण्याची विनंती करीत असल्याचे चित्र आहे.

महायुतीकडे इच्छुकांनी वाढली गर्दी

विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या यशानंतर महायुतीकडून निवडणूक लढविण्यास इच्छूक असणाऱ्यांचा कल वाढला आहे. त्यामुळे महायुतीकडे इच्छुकांची गर्दी वाढल्याचे चित्र आहे.

पदाधिकारी कार्यकर्ते लागले कामाला

गोंदिया, तिरोडा नगर परिषद व सालेकसा, गोरेगाव पंचायत समितीची निवडणूक गेल्या दोन वर्षापासून लांबणीवर पडली आहे. प्रशासकराजमुळे शहरातील विकासकामांना खीळ बसली आहे. पण आता राज्य सरकारने लवकरच निवडणूका घेण्याचे संकेत दिल्याने प्रमुख पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते कामाला लागले आहे. तर इच्छुकांनी प्रभागात सक्रिय होत नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यास सुरुवात केली आहे.

त्यामुळे त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेण्याच्या हालचाली सुरु केल्या आहे. डिसेंबरअखेर किंवा जानेवारी महिन्यात या निवडणूका होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे गोंदिया, तिरोडा येथे इच्छुकांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. तर आमगाव नगर परिषदेचा मुद्दा न्यायप्रविष्ठ आहे.

गोरेगाव आणि सालेकसा नगरपंचायतमध्ये सध्या प्रशासकराज सुरु आहे. मात्र आता निवडणूका जाहीर होण्याची शक्यता असल्याने उच्छुकांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे.

गोंदिया-भंडारा जिल्ह्यात खा.प्रफुल पटेल ठरले किंगमेकर

गोंदिया:- महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूकांचा आज निकाल जाहिर होताच परत एकदा राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल हेच भंडारा-गोंदिया जिल्ह्याचे राजकीय किंगमेकर असल्याचे स्पष्ट झाले आहे. महायुतीच्या निवडणूक प्रचाराची एक हाती धुरा सांभाळत त्यांनी दोन्ही जिल्ह्यातून नाना पटोले वगळता महाविकास आघाडीचा सुपळा साफफ केला आहे.लोकसभा निवडणूकीत झालेला दगाफटका लक्षात घेत यावेळी त्यांनी तब्बल भंडारा-गोंदिया जिल्ह्यात १५ दिवस ठिय्या मांडला होता.

या निवडणूकीत कुठल्याही परिस्थितीत महायूतीला पुर्ण जागा जिंकवून देण्याचा त्यांनी घेतलेला मानस पुर्ण करीत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना त्यांच्याच मतदारसंघात जब्बर धक्का दिला.पटोलेंना अवघ्या २१४ मतांनी विजय मिळवता आला.

गोंदिया जिल्ह्यातील चारही जागा महायूतीच्या पारड्यात पटेल यांनी पाडत विजयाचे आपणच शिल्पकार असल्याचे दाखवून दिले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट व लाडक्या बहिणीच्या मतांनी भाजप महायुतीच्या उमेदवारांना विजय मिळविता आल्याने राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयासमोर जल्लोष साजरा करण्यात आला. गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील ७ ही विधानसभा मतदारसंघात रात्रदिवस प्रचाराचा धुराळा प्रफफुल पटेलांनी उडविला होता. त्यातच गोंदिया ,अर्जूनी मोरगाव व साकोली विधानसभा मतदारसंघात विशेष लक्ष देत रात्रीच्यावेळीही बैठका घेत कार्यकर्त्यांना यावेळी कुठलीही चूक नको असे स्पष्ट निर्देश देतच कामाला लावले होते.

"लाडक्या बहिणीं'च्या राज्यात महिला आमदारांची संख्या रोडावली

गोंदिया:- विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले, महायुतीकडून निवडणूक लढणारे हौसे, नवसे, गौवसे, मंत्र्यांच्या मागे धावणारे त्यांचे स्वीय सहायक, सर्वच निवडून आले. अनब हा सर्व चमत्कार "लाडकी बहीण' योजनेमुळे झाला, असे दावेही केले जाऊ लागले. एकीकडे लाडकी बहीण योजनेला प्रचंड प्रतिसाद मिळालेला असताना दुसरीकडे महिला उमेदवारांनाच नाकारल्याचं चित्र आहे. यंदा विधानसभा निवडणुकीत एकूण ४ हजार १३६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. त्यापैकी २५० च्या जवळपास महिला उमेदवार होत्या. म्हणजेच एकूण उमेदवाराच्या सहा ते सात टक्केच महिलांना संधी मिळाली. आता निवडून आलेल्या महिला उमेदवारांची संख्याही ७ टक्क्यांच्या घरातच आहे.

२३ नोव्हेंबरला झालेल्या मतमोजणीत २५० पैकी फफक्त २१ महिला उमेदवार विजयी ठरल्या. यामध्ये भारतीय जनता पक्षाच्या सर्वाधिक महिला आहेत. भाजपाच्या १४ महिला उमेदवार जिंकून आल्या असून यामध्ये १० उमेदवारांचा पुन्हा विजय झाला आहे. यामध्ये चिखलीतील श्वेता महाले, जिंतूरमधून मेघना बोर्डिकर, नाशिक मध्यमधून देवयानी फरांदे, नाशिक पश्चिममधून सीमा हिरे, बेलापूरमधून मंदा म्हात्रे, दहीसरम धून मनीषा चौधरी, गोरेगाव येथून विद्या ठाकूर, पर्वतीमधून माधुरी मिसाळ, शेवगावमधून मोनिका राजळे आणि कैजमधून नमिता मुंदडा यांचा समावेश आहे. भोकरमधील श्रीजया चव्हाण, कल्याण पूर्वमधून सुलभा गायकवाड, वसईममधून स्नेहा पंडित, फुलांब्रीमधून अनुराधा चव्हाण या नव्या महिला उमेदवारांनीही यंदा दणदणीत विजय मिळवला.

साक्रीतून मंजुळा गावित, कन्नडमधून संजना जाधव या शिवसेना (एकनाथ शिंदे) यांच्या पक्षातून निवडून आल्या. तर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार) सुलभा खोडके (अमरावती), सरोज अहिरे (देवळाली) आणि अनुशक्तीनगरमधून सना मलिक तर, श्रीवर्धमधून आदिती तटकरे यांचा विजय झालाय. तर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने १० महिला उमेदवारांना निवडणूक लढवण्याची संधी दिली होती. परंतु, त्यातील एकही महिला उमेदवाराचा विजय झाला नाही.

२०१९ मध्ये भाजपाने १२ महिला उमेदवारांना संधी दिली होती. तर, शिवसेनेने ९, काँग्रेसने १५ आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने ९ महिला उमेदवारांना संधी दिली होती. म्हणजेच मुख्य प्रवाहातील पक्षांनी ४५ महिला उमेदवार उभे केले होते. त्यापैकी फक्त २४ महिला उमेदवार जिंकल्या. २८८ सदस्यांच्या विधानसभेत फक्त २४ महिला आमदार म्हणजेच फक्त ८ टक्के महिला आमदार होत्या. तर यावेळी २१ महिला उमेदवार जिंकल्याने ही टक्केवारी ७ टक्क्यांवर आली आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये राज्यात ३३ टक्के महिला आरक्षणाचा ठराव पास करण्यात आला. पुढची जनगणना झाल्यानंतर ३३ टक्के आरक्षणाचे बिल अंमलात येणार आहे. तेव्हा सभागृहात २८८ पैकी ९६ महिला आमदार असणं अपेक्षित असेल. त्यामुळे सभागृहात महिला प्रतिनिधींचा आवाज वाढवण्याकरता आता २०२९ च्या निवडणुकीची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

तब्बल ६५ आमदारांचा पराभव;६ आमदारांचं डिपॉझिटही जप्त

गोंदिया:- महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ चा निकाल जाहीर झाला आहे. यंदाच्या विधानसभेत महायुती घवघवीत यश मिळवत सत्तेची चावी आपल्याकडे राखण्यात यशस्वी ठरली. तर, महाविकास आघाडीला दारुण पराभवाचा सामना करावा लागला. पण, यंदाच्या विधानसभेत सर्वात मोठा उलटफेर पाहायला मिळाला. मतदारांनी महायुतीच्या पदरात मतांचं दान टाकलं खरं, पण त्यासोबतच अनेक विद्यमान आमदारांना पराभवाची चव चाखायला भाग पाडलं. अनेक ठिकाणी तर मतदारांनी प्रस्थापितांचा पुरता धुव्वा उडवला. यंदाच्या निवडणुकीत तब्बल ६५ आमदारांना पराभवाचा सामना करावा लागला. एवढंच काय तर, तब्बल ६ आमदारांचं तर डिपॉझिटही जप्त झालं आहे.

महाराष्ट्राच्या चौदाव्या विधासभेतील तब्बल १८५ आमदार पुन्हा पंधराव्या विधानसभेत दिसणार आहेत. २५० आमदारांनी पुन्हा निवडणूक लढवली, त्यापैकी ६५ आमदारांना दारुण पराभवाचा सामना करावा लागला आहे. तर, तब्बल ६ आमदारांचं डिपॉझिटही जप्त झालं आहे. या पराभूत आमदारांमध्ये सर्वाधिक १९ काँग्रेसचे, तर राष्ट्रवादीचे (अजित गट) १० आमदार निवडणुकीत पराभूत झाले आहेत. तर, शरद पवारांचे ८ आणि उद्धव गटाचे ७ आमदार पुन्हा जिंकू शकले नाहीत. तसेच, एकनाथ शिंदे यांच्या ६, भाजपचे ५, बहुजन विकास आघाडीचे ३, प्रहारचे २, एमआयएम आणि मनसेच्या एका आणि तीन अपक्ष आमदारांना पराभवाचा सामना करावा लागला. या सर्व आमदारांना मतदारांनी नाकारल्याचं निवडणूक निकालांमध्ये स्पष्ट झालं.

शरद पवारांचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या पश्चिम महाराष्ट्रात तर सर्वाधिक २० विद्यमान आमदार विधानसभा निवडणुकीत पराभूत झाले. त्यानंतर विदर्भातील १२ आमदारांना पराभवाचा सामना करावा लागला होता. मुंबईतील ८ आमदारही निवडणूक जिंकू शकले नाहीत.

"या" विद्यमान आमदारांचा दारुण पराभव

आरमोरीचे कृष्णा गजभे, तिवस्यातून यशोमती ठाकूर, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, राजेश टोपे, बच्चू कडू, धीरज देशमुख, शहाजी बापू पाटील, संजय रायमूलकर, डॉ.राजेंद्र शिंगणे, प्राजक्त तनपुरे, भगिरथ भालके, मुंबईतही अनेक प्रस्थापित विद्यमान आमदारांना मतदारांनी पराभव चाखायला भाग पाडलं. त्यात वर्सोव्यातून भारती लवेकर, भायखळ्यातून यामिनी जाधव, माहीममधून सदा सरवणकर, वांद्रे पूर्वमधून झिशान सिद्दिकी, चेंबूरमधून प्रकाश फातेर्पेकर, अंधेरी पूर्वमधून ऋतुजा लटके, भांडुपमधून रमेश कोरगांवकर आणि आपला मतदारसंघ सोडून मानखुर्दमधून निवडणूक रिंगणात उतरलेले नवाब मलिक यांचाही निवडणुकीच्या रिंगणात दारुण पराभव झाला.

"या" विद्यमान आमदारांचं डिपॉझिटही जप्त

निवडणूक रिंगणात उतरलेल्या विद्यमान आमदारांपैकी काही आमदारांचा तर पार सुपडा साफफ झाला. सहा आमदारांना एकूण मतांपैकी १६ टक्के मतंही मिळवता आली नाहीत. त्यात मीरा-भाईदरमधून गीता जैन, मानखुर्दमधून नवाब मलिक, मेळघाटमधून राजकुमार पटेल, मोर्शीतून देवेंद्र भुयार, गेवराईतून लक्ष्मण पवार आणि आष्टीमधून बाळासाहेब आजबे यांचा समावेश आहे.

मतदान विरुद्ध मतमोजणी

९५ मतदारसंघात तफावत

१९ मतदारसंघात ईव्हीएममध्ये जास्त मते आढळली

७६ मतदारसंघात ईव्हीएममध्ये कमी मते आढळली

बुथ पातळीवर फार्म २० तपासणीत तफावत असलेल्या मतदारसंघाची संख्या आणखी वाढू शकते.

१९३ मतदारसंघात फरक नाही

मतदान आणि मतमोजणीत एक-सारखीच मते. ईव्हीएम आकडेवारीत कोणताही फरक नाही.

संपादकीय

विधानसभा निवडणूक विश्लेषण "जोरका धक्का:'

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल म्हणजे हरियाणा निकालाची पुनरावृत्ती आहे, असे प्रारंभी म्हणावे लागेल. सर्व मान्यवरांचे, अभ्यासकांचे तर्क-वितर्क हरियाणामध्येही काँग्रेसचे सरकार येण्याचे चित्र मांडत असताना प्रत्यक्षात भाजपाने बाजी मारली. अगदी त्याचप्रमाणे इथेही चित्र फिरले आणि हरियाणाप्रमाणे मोजके राजकीय पक्ष नसूनही विजय खेचून आणण्यात महायुतीला मोठे यश मिळाले. अशा प्रकारचा पराभव अनपेक्षित असणाऱ्या महाविकास आघाडीला हा "जोर का धक्का:' म्हणावे लागेल.

राज्य विधानसभेच्या झालेल्या निवडणुकीत भाजपा, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा) या तीन पक्षांच्या महायुतीने देदीप्यमान विजय संपादन केला. विधानसभेच्या २८८ पैकी २३० पेक्षा जास्त जागांवर विजय संपादन करून विधिमंडळाच्या इतिहासात एक नवा विक्रम निर्माण केला. भारतीय जनता पक्षाने, तर २०१४, २०१९ आणि २०२४ अशा सलग तीन विधानसभा निवडणुकांमध्ये आपल्या पक्षाचे शंभरपेक्षा जास्त आमदार निवडून आणून एक इतिहास निर्माण केला. गद्दारांना पाडा, अदानींना हटवा अशा घोषणांचा घोशा लावणाऱ्यांना आणि "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'ला विरोध करणाऱ्यांना जनतेने धडा शिकवला.

संपूर्ण देशाचे लक्ष लागून असणाऱ्या महाराष्ट्रातील निवडणुकांच्या निकालातून कल स्पष्ट झाला असून लोकसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर नव्या दमाने आणि जोमाने पुढे आलेला भारतीय जनता पक्ष आणि महायुतीने मारलेली मुसंडी हे लक्षवेधी मुद्दे आगामी काळातील राजकारणाचे वारे निर्देशित आणि नियमित करणारे ठरणार आहेत. राज्यातील या निवडणुकीला राजकीय अस्थैर्य, विरोधकांचा तीव्र आणि टोकाचा विरोध, दिवसामाजी बिघडत जाणारे सामाजिक वातावरण याची किनार होतीच, खेरीज बदलापूरचे बालिका अत्याचार प्रकरण, शिवाजीराजांचा पुतळा कोसळणे, मराठा आंदोलनाने वातावरण गढूळ होणे आदी कारणेदेखील होती. खोके सरकार, गद्दार, आमदार अपात्रतेच्या मुद्द्यांचा कोलाहलही पाठीमागे होताच. तशातच लोकसभा निवडणुकीमध्ये देशात जेमतेम तारल्या गेलेल्या भाजपाला राज्यातील जनतेने नाकारल्याचे चित्रही तणाव वाढवणारे होते. मात्र अशा तणावग्रस्त अवस्थेतही महायुतीने संयमाने आणि नेटक्या नियोजनानिशी परिस्थिती सावरली आणि नेत्यांपासून सर्वसामान्य कार्यकर्त्यांपर्यंत सगळ्यांनीच प्रयत्नपूर्वक जनमताचा कौल आपल्याकडे वळवण्यात यश संपादीत केले.

२०१९ मध्ये जनतेने ठाकरे यांच्या पक्षाला काँग्रेसच्या विरोधात मतदान केले होते, पण निकालानंतर त्यांनी काँग्रेसशी केलेला घरोबा जनतेला पसंत पडला नाही. त्याची शिक्षा विधानसभा निवडणुकीत मतदारांनी उबाठा सेनेला दिली. दारुण पराभव झाल्यानंतर ईव्हिएम मशीनवर संशय घेणे आणि ईव्हिएम मशीन्स मॅनेज केली असे सांगणे म्हणजे नाचता येईना अंगण वाकडे असे म्हणावे लागेल.

थोडक्यात, हा जनतेने घेतलेला एक निर्णय असला तरी त्याचे अनेक अन्वयार्थ निघतात. या काळात संपूर्ण देशाने योगी आदित्यनाथ यांच्या "बटेंगे तो कटेंगे' तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या "एक हैं तो सेफ हैं'चा नारा ऐकला. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये तो लक्षवेधी ठरलेला दिसत आहे. त्यामुळेच महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालाचे कल भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीए आघाडीचे वादळ दर्शवत असणे स्वाभाविक आहे. महाराष्ट्रातील २८८ जागांमध्ये भाजपाच्या महायुती आघाडीला २०० हून अधिक जागा मिळणे जनतेचा बदलता कल स्पष्ट करणारे आहे. दुसरीकडे, उत्तर प्रदेशमध्ये नऊ विधानसभा जागांसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपाला किमान सात जागा मिळताना दिसत आहेत. या विजयाचे प्रमुख कारण ध्रुवीकरण असल्याचे मानले जात आहे. अर्थातच याचे विश्लेषण होत राहणार आहे.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या विजयानंतर भाजपा सावध झाला. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीला ४८ पैकी ३१ तर महायुतीला १७ जागा मिळाल्या. यानंतर भाजपा आणि संघाने आपली रणनीती बदलली. अत्यंत सावधगिरीने योगी आणि मोदींनी बाजी मारली. २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीचे आकडे बघितले, तर भाजपाला १०५ जागा मिळाल्या होत्या. दुसरीकडे, शिवसेनेला (अविभाजित शिवसेना) ५६ जागा, राष्ट्रवादीला (अविभाजित राष्ट्रवादी) ५४ जागा आणि काँग्रेसला ४४ जागा मिळाल्या होत्या. त्यानंतर शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसने मिळून सरकार स्थापन केले. मात्र, ही आघाडी जास्त काळ सरकार चालवू शकली नाही. जून २०२२ मध्ये शिवसेनेतील अंतर्गत वादामुळे एकनाथ शिंदे वेगळे झाले. अजित पवारांनी राष्ट्रवादीतील एक गट सोबत आणला. यानंतर ते एकनाथ शिंदे यांच्या भाजपा आणि शिवसेना सरकारमध्ये सामील झाले आणि उपमुख्यमंत्री झाले. राष्ट्रवादीच्या मतदारांना महायुतीकडे वळवण्यात या घटकांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्याच वेळी शिवसेनेच्या मतदारांना महायुतीशी जोडण्यातही शिंदे यांना यश आले. ताज्या निकालाने महाराष्ट्रातील मराठा फॅक्टर आणि बेरोजगारीचा मुद्दा महाविकास आघाडीच्या फायद्याचा राहिला नसल्याचे स्पष्ट केले आहे. किंबहुना, मतांच्या ध्रुवीकरणामुळे हे मुद्दे मागे पडले, असेही आपण म्हणू शकतो. त्याच वेळी देशभरात बळकट झालेल्या हिंदुत्वासारखा मुद्दा महायुतीने समोर आणला. महायुतीला अपेक्षेप्रमाणे योगी आणि मोदींच्या घोषणांची मोठी मदत मिळाली.

हरियाणामध्ये योगी आदित्यनाथ यांनी ही घोषणाबाजी केली आणि तिथे भाजपाचा विजय झाला. मात्र, भाजपाने योगींचे "बटेंगे ते कटेंगे'असे बॅनर महाराष्ट्रात लावले तेव्हा तीव्र प्रतिक्रिया उमटल्या, कारण उत्तर प्रदेश किंवा हरियाणाप्रमाणे महाराष्ट्रमध्ये हिंदुत्व प्रचलित नाही. पण, निकाल समोर आल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणातही ध्रुवीकरणाचे पर्व सुरू झाल्याचे जाणवले आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने "संविधान बचाआ'चा नारा दिला होता. ही घोषणा विशेषत: उत्तर प्रदेशमधील लोकसभा मतदारसंघांमध्ये कामी आली. मात्र महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत या घोषणेचा शून्य परिणाम बघायला मिळाला. खेरीज मराठा आरक्षणावरही काँग्रेस बाजी मारू न शकल्याचे चित्र दिसत आहे.

सर्वात महत्त्वाचा आणि लक्षात घेण्याजोगा मुद्दा म्हणजे महाराष्ट्र निवडणुकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची मोलाची मदत झाली आहे. हरियाणाप्रमाणे येथेही आरएसएसचे लोक भाजपाच्या प्रचारासाठी सक्रिय होते. किंबहुना, लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशमध्ये भाजपाच्या खराब कामगिरीचे कारण जनसंपर्क कमी पडणे, सर्वसामान्यांपर्यंत कार्यकर्ते न पोहोचणे हे मानले जात होते. मात्र ही चूक सुधारत महाराष्ट्रात संघ कार्यकर्ते प्रचारात उतरले. संघाच्या स्वयंसेवकांनी भाजपाच्या मागे आपली शंभर टक्के ताकद लावली होती. भाजपालाच मत द्या, असा त्यांचा थेट प्रचार नसला तरी अप्रत्यक्षपणे त्यांनी आपल्याच विचाराच्या भाजपाला मोठे बळ देण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळेच यंदा गल्लोगल्ली, प्रत्येक वॉर्डामध्ये संघाची ताकद दिसली. त्यामुळेच भाजपाचे पारडे यशाकडे मोठ्या प्रमाणात झुकले.

लोकसभा निवडणुकीमध्ये मुस्लीमांची एकगठ्ठा मते उद्धव ठाकरेंच्या पारड्यात पडली. मात्र आताच्या निवडणुकीत त्याच्या परिणामांची जाण करून देण्यात महायुती यशस्वी ठरली. लोकसभा निवडणुकीनंतर बांगलादेशमध्ये घडलेल्या घटना जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहिल्या. जणू त्याला प्रतिक्रिया म्हणूनच सिमल्यातील एक अवैध मशिद पाडण्यासाठी तिथला समस्त हिंदू समाज एकवटलेला दिसला. म्हणजेच जातीपातीच्या, प्रांत, भाषेच्या नावाने आपण वेगवेगळे राहिलो तर आपल्यावर अतिक्रमण होईल, हे मत जनतेला पटलेले दिसले. एक राहिलो तर आपल्याकडे कोणी वाकड्या नजरेने पाहू शकणार नाही, कोणी हल्ला करणार नाही हा विचार स्वीकारल्याचेही जनतेने ताज्या निकालाद्वारे सूचित केले आहे. एकीचा हाच मुद्दा महाराष्ट्रात, विशेषत: ग्रामीण भागात वारकरी सांप्रदायानेही उचलून धरला. त्यांनी छोट्या छोट्या गटसभा घेऊन, अगदी ५०-१०० लोकांच्या सभा घेत हा विचार पोहोचवण्याचे मोलाचे काम केले. एखाद्या देवळात, आवारात पार पडलेल्या अशा छोट्या सभांची संख्या ६० ते ७० हजारांच्या घरात होती. त्याचाही परिणाम ताज्या निकालावर प्रभावीपणे दिसून येत आहे.

या सगळ्याबरोबरच जनतेच्या डोळ्यांसमोर महायुतीचे काम होतेच. मध्य प्रदेशातील भाजपा सरकारच्या ङ्गलाडली बहन योजनेफ्नंतर महाराष्ट्रातील महायुती सरकारनेही "मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' सुरू केली आणि वेगाने रेटली. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जात आहेत. भाजपाच्या दणदणीत विजयात या घटकाचाही मोठा वाटा असल्याचे मानले जात आहे. विरोधकांनी या योजनेला मोठा विरोध केला. काही दिवसांमध्येच महिलांना पैसे मिळणे बंद होईल, सरकारची ही महत्त्वाकांक्षी योजना बंद होईल असे म्हणत एकीकडे त्यांनी अपप्रचार केला, तर दुसरीकडे महाविकास आघाडीतील मोठ्या राजकीय पक्षांनी आपल्या प्रचारा दरम्यान जाहीर केलेल्या जाहीरनाम्यामध्ये आपले सरकार सत्तेत आल्यास महिलांच्या खात्यात तीन हजार रुपये जमा करण्याच्या घोषणा केल्या. ही बाबही चाणाक्ष नागरिकांच्या नजरेतून सुटली नाही. खेरीज महाविकास आघाडीचा भाग असलेली काँग्रेस, उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांनी महागाई, बेरोजगारी या मुद्द्यांवर केलेला राज्य सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्नही तोकडा पडला. त्यांना जनतेचा पाठिंबा मिळेल, अशी आशा होती.

पण, परिणाम उलटे झाले. महाराष्ट्रात सोयाबीनच्या हमीभावाचा मुद्दाही उपस्थित झाला नाही. राहून गेलेल्या अशा अनेक मुद्द्यांवर पुढील काळात चर्चा होत राहीलच. सविस्तर अवलोकनही होईल. मात्र तूर्तास तरी महायुती भरभक्कम आघाडी मिळाल्याचा आनंदोत्सव साजरा करत आहे. त्यांना शुभेच्छा देत पुढील पाच वर्षांमध्ये सुशासनाची अपेक्षा व्यक्त करू या.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

उतू नका!, मातू नका!,हक्कासाठी लाजू नका?

दिवसेंदिवस निवडणुकीतील वैचारिक प्रगल्भता कमी होऊन, पाडापाडीची द्वेषपूर्ण, भ्रष्टाचारी, दंगेखोर राजनीती तयार असल्याचे चित्र स्पष्ट झाले ?. निवडणुकीची आचारसंहिता लागल्यापासून ठिकठिकाणी, चेक पोस्टवर सोने-चांदी, करोडो रुपये पकडल्याचे दिसत आहे. म्हणजेच निवडणुकीत भ्रष्टाचाराची पालेमुळे ही अति खोलवर रुजलेली जनतेला दिसलीत व महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा हा भ्रष्टाचारी असल्याचे समोर आले ? आता विधानसभा निवडणुकीचे निकाल बाहेर येताच, प्रत्येकच मतदाराला वाटते की, आपण ज्या पक्षाला मतदान केले, तो निवडून यायला पाहिजे होता? पण राजकीय गणिते वेगळीच असतात ? ते मुंबई- दिल्लीवरून ठरतात ? आतातर उमेदवार निवडून आणणे व उमेदवार पाडणे ही गणिते आजच्या सत्तेतील मूळ व्यवस्था झाली ? त्या निवडणुकी व्यवस्था सामान्य जनतेसाठी नाही तर, राज्यकर्त्यांना चालविण्यासाठी आहेत. काही कार्यकर्ते विजयोत्सवात सामील होतात,तर काही कार्यकर्ते इकडे निकाल लागताच डोके फोडाफोडीची भाषा करतो.? आणि नेते मात्र मुंबई-दिल्लीत जाऊन एका ताटात जेवायला बसतात आणि हा निस्सिम भक्त , नेत्याच्या हूजरे गिरीचा कार्यकर्ता आपलेच घर मतासाठी भांडणे करून स्वतःचीच घरे पेटवायला निघतो? कारण नेत्याचे मटण, पचवलेली दारू व घेतलेली लाच त्याच्या अंगात संचारते? तरुणांना त्यासाठीच तर प्रोत्साहित केल्या जाते ? देशाची आर्थिक धोरणे ही परिपक्व व्यक्तींना, सामाजिक परिस्थितीची जाणीव असलेल्यानाचं असते ? परंतु आज मतदानाचे वय वर्ष २१ वरून मात्र १८ वर्षावर आले, त्याचाच अर्थ फक्त तरुण लोकांना या डांगीवरून त्या डांगेवर उड्याम ारणारे नेतेच आवडतात ? कारण या देशाच्या आर्थिक विकासाचा विषय ह्या त्यांच्या डोक्याच्या बाहेर असतो? काही पदवीधर तरुणांना वाटते आपण तर डिग्री होल्डर आहोत, ती डिग्री फक्त एखाद्या वैयक्तिक विषयाची असते? पण डिग्रीचे शिक्षण देताना त्याच्या आई-वडिलांची किती कसोटी लागते? ही जाण फार कमी तरुणांना असते? परंतु जीवन जगताना सामाजिक जीवनाच्या अभ्यासासाठी अनुभवाची सुद्धा गरज असते, तो अनुभव त्यांच्या पाठीशी नसतो, ईथेच फ्फार मोठी तरुणांची गलफ्फत होते.

आता निवडणुकीचे निकाल जाहीर होताच, अपक्ष आमदारांचा व छोट्या पक्षांचा घोडेबाजार सुरू होणार? कारण सत्ता स्थापनेसाठी कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत नाही. आणि तसेच महाराष्ट्रात प्रत्येक मतदारसंघात महाविकास आघाडी व महायुतीमध्ये जास्त बंडखोरी झाल्याचे दिसले. तिसरी आघाडी व वंचित बहुजन आघाडी यांनी ग्रामीण भागातील शेतकरी शेतमजुरांचे मते घेतल्यामुळे हा फ्फायदा महायुतीला होण्याचे संकेत दिसतात. कारण ग्रामीण भागात शेतकरी-शेतमजुराच्या मताधिक्याचा फटका काँग्रेस व राष्ट्रवादीला बसल्याचे दिसत आहे. तसेच भाजपाचे सरकार चालविण्यासाठी व सत्ता टिकवण्यासाठी गेली पाच वर्ष भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस यांची कसरत जरी पणाला लागली असली तरी ते नायकाचे खलनायक असल्याची भूमिका वाटली. महाराष्ट्रात त्यांनी लाडक्या बहिणीला तारले असले तरी शेतकऱ्यांचा मात्र विश्वास गमावल्याचे चित्र स्पष्ट झाले. पक्षांतर्गत कलहात फुटीरवादीचा फायदा घेऊन अजित पवार व श्री एकनाथजी शिंदे या दोन्ही संधी साधूनी पुढील राजकारणासाठी स्वतःची पकड तयार केली. त्याचा फ्फायदा किती मिळेल हे आता निवडणुकीनंतर समजेल

तसेच दिवसेंदिवस निवडणुकीत जातीसाठी, माती खाणारी भ्रामक कल्पना तयार केल्या जात आहे ? लोकसभा-विधानसभा ह्या निवडणुकी आता जनतेसाठी राहिल्या नाहीत तर त्या फ्फक्त आता नेत्यांच्या प्रतिष्ठेच्या झाल्या आहेत? म्हणूनच हे सर्व नेते मंडळी राजकीय पक्षांच्या दारोदारी फिरताना दिसते ? कोणत्याच नेत्याला कोणत्याच राजकीय पक्षाचे देणे- घेणे राहिले नाही? तर फक्त स्वतःचा स्वार्थ साधने एवढीच जबाबदारी आहे? आणि समाज मात्र जागच्या जागेवरच, जिथल्या तिथेच राहणार आहे ? आता पुढील हे सत्तेतील दलालाना, जिल्हा परिषद, कृषी उत्पन्न बाजार समिती, को-ऑपरेटिव्ह बँक, पंचायत समिती ह्या निवडणूकी त्यांना लढवायच्या आहेत. हे असेच पुढेही ग्रामीण व शहरी लोकांना प्रत्येक निवडणुकीत फ्फसवीनार व लुटणार आहेत. स्वतःच्या स्वार्थासाठी तुमच्यातच भांडणे लावून डोके फोडाफोडी करतील? हे गाव पातळीवरील नेते गाव विकास नाहीतर, स्वतःच्या विकासासाठी मतदाराच्या मागे धावत असतात. आणि आपण मतदार या सर्व व्यवस्थेला बळी पडत आहोंत. म्हणून गावातील लोकांनी आपले मतभेद विसरून सावध भूमिका घेणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मूळ घटनेत बरेचसे बदल करून ती घटना कमजोर केलेली आहे? ती राज्यकर्त्यांनी व सत्ताधीशांनी स्वतःच्या स्वार्थासाठी, मोडतोड केली. म्हणजेच जेवणाच्या ताटात जर मीठ आणि तिखट नसेल तर जेवण स्वादिष्ट असले तरी ते बेचव वाटते असेच आता जनतेचे जगणे सुद्धा बेचव केल्या गेले?

जनतेचे जगणे जरी शेती आणि शेतकरी या विषयाशी संबंधित आहे. तरी मात्र काही

प्रचारक मंडळी, पत्रकार बंधू , मीडिया, काही इलेक्ट्रॉनिक चॅनेल, सुद्धा निवडणुकीची आचारसंहिता लागेपर्यंत शेती आणि,शेतकरी आत्महत्या, शेतकरी अन्यायावर आवाज उठवीतात.? मात्र निवडणुकी लागल्यानंतर यातील काही प्रचारक, मीडिया व पत्रकार बंधू निवडणुकीच्या काळात शेतकरी धर्मवाऱ्यावर सोडतात. निवडणुकीत फक्त जाती-धर्माचे, मंदिर मज्जित व हिंदू-मुसलमानाची वारे पसरविण्यात तरबेज असतात? तो जरी त्यांचा धंदेवाईक व्यवसाय असेल? तरी, अशा अपप्रचारामुळे जनतेची व मतदाराची दिशाभूल होते. मग निवडणुकी संपल्यानंतर मात्र शेती व शेतकऱ्यांच्या व्यवस्थेशी संबंधित राहतात? ज्या शेतीचे धोरणे निवडणुकीत, राजकारणात फ्फ सलेली आहेत, तेव्हाच ही चाणक्य मंडळी बगल देतात. व आणखी पुढील पाच वर्ष शेती व शेतकरी म्हणून बोंबलून निवडणुकीत मतदानाची वेळ मारून नेल्या जाते. मात्र प्रश्न असा पडतो की, शेती आणि शेतकऱ्यांचा विषय हा निवडणुकीत कां रंगविल्या जात नाही? तो देशाच्या आर्थिक धोरणाशी निगडित आहे ना? शेतकऱ्यांच्या, शेतमजुरांच्या, बेरोजगारांच्या, कामगारांच्या, आत्महत्या झाल्यात? त्यांना महत्त्वाचे वाटत नाही कां? जाती धर्मावर तुटून पडून, जातीतील रक्त खळवळून देण्यात संकोच वाटत नाही? अशा प्रचाराला प्राधान्य देऊन ती प्रतिष्ठा बनविल्या जाते.

जो विषय रात्रंदिवस जगन्याशी संबंधित आहे, त्या विषयाची अवहेलना केली जाते. आणि शेतीत पिकणाऱ्या मालाची महागाई वाढल्याचा विनाकारण अप-प्रचार केला जातो. शेतकरी ध्येयधोरणाची विचारधाराच चुकीची पसरविल्या जाते. अशा निवडणूक काळात खरी वस्तुस्थिती न दाखवीता मतदारांची दिशाभूल करून शेतकऱ्यांचे जीवन जगण्याचे खच्चीकरण केले जाते. देशात होत असलेल्या शेतकरी आत्महत्या बद्दल जरी यांना कळवळा असेल तरी मात्र निवडणूक काळात शेती व शेतकरी या विषयाची प्रतारणा केल्यामुळे व सौदेबाज लुटारू व दरोडेखोरांची बाजू घेतल्यामुळे समाज भरकटल्या जातो. सतत प्रश्न पडतो की, ही निवडणूक लढाई नुसती हिंदुत्वाचे नावावर राज्यकर्ते पोसण्यासाठी आहे की, देशाला जीवन जगविणाऱ्या शेतकऱ्यांसाठी आहे? त्यामुळेच "अबकी बार, किसान सरकार" ही व्यवस्था कोलमोडून पडते. हे जरी खरे असले तरी, शेती आणि शेतकऱ्यांचा प्रश्न हा आता राजकारणात व केंद्रात फसलेला आहे. शेतीचे धोरणे व शेतकऱ्यांशी संबंधित असलेली व्यवस्था, चुकीची धोरणे शेतकऱ्यांच्या जगण्याच्या व्यवस्थेला हानिकारक आहेत.

मात्र निवडणुकीचे काळात ,पत्रकार मीडिया व भ्रामक राज्यकर्ते जाती-धर्माच्या बाजूने बोलतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर फ्फार मोठा गंभीर परिणाम होतो. निवडणूक काळात चुकीचे वातावरण तयार केले जात असल्यामुळे शेतकरी संघटनेनी जागृत केलेल्या पाच वर्षांच्या शेतकरी चळवळीवर संपूर्ण पाणी फेरले जाते. महाराष्ट्रातील नव्हे तर सपूर्ण देशातील शेतकरी जाती-जातीत वाटप करून जातीचे नेते तयार केले गेले, कारण मूळ आर्थिक विषयाला बगल देण्यासाठी ही फ्फार सोपी पद्धत आहे? याबद्दलची दक्षता व सावधानता आता पुढे मतदारांना घेणे गरजेचे आहे . ह्या अशा निवडणुकी राज्यकर्ते व सत्ताधीशां च्या फ्फायद्याचे असतात , तर त्याच शेतकऱ्यांसाठी निराशा जनक आहेत?

तसेच सेवा.सह.सोसायटीचे मेंबर, ग्रामपंचायत चे मेंबर हे त्या स्थानिक नेत्याच्या पुढील राजकारणासाठी फायद्याचे जास्त असतात तर, ते जनतेचे सेवेसाठी फ्फक्त नामधारी असतात? व ते सर्व बेरोजगारीचे कारखान्यात ढकले जातात. हा सर्व भुलभुलय्या आहे? त्या तरुणाच्या डोक्यात जगण्यापेक्षा राजकारणाची हवा भरून दील्याजाते? त्या उमेदवाराला शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याची जाणीव नसते. ते तरुण सुद्धा गावातील भोपाली लीडरच्या व्यवस्थेला बळी पडतात? निवडून येणारा शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा कलंक मिटविण्यासाठी, अभ्यासू नेतृत्वाचा, आर्थिक स्वातंत्र्यासाठी लढाई लढणारा, शेतकरी प्रश्नांशी संवेदनशील प्रामाणिक उमेदवार असावा?.

सतत निवडून येणारे, तेच ते उमेदवार हे देशातील आर्थिक स्वातंत्र्याशी निगडित नाही. ते सर्व सत्ताधीश व राज्यकर्त्यांशी हितगुज राखनारे दलाल असतात? त्यासाठी आता वैचारिक दृष्ट्या बदल करणे, व शेतकरी समृद्ध करणे हीच काळाची गरज आहे. संधी-साधूच्या व्यवस्थेला बळी पडून मतदारांचा उपयोग करून घेतल्या जातो . हेच आता सर्वश्रुत आहे. शेवटी सत्तेच्या उपभोगासाठी, निवडून येणाऱ्या सर्वच उमेदवारास भावी प्रगतिच्या वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.

जय जय... महाराष्ट्र.
आपला नम्र :-
धनंजय पाटील काकडे .

संविधान धर्मनिरपेक्षच! सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

नवी दिल्ली:- राज्यघटनेच्या उद्देशिकेत "समाजवादी', "धर्मनिरपेक्ष' आणि "एकात्मता'या शब्दांच्या समावेशाला आव्हान देणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी फ्फेटाळल्या. "समाजवादी' हा शब्द डाव्या किंवा उजव्या आर्थिक धोरणांशी निगडित नसून तो कल्याणकारी प्रजासत्ताकाचे द्योतक असल्याचे न्यायालयाने निकालात नमूद केले.

१९७६मध्ये तत्कालीन इंदिरा गांधी सरकारने राज्यघटनेमध्ये ४२वी दुरुस्ती करून उद्देशिकेत या तीन संज्ञा जोडल्या होत्या. राज्यसभेचे माजी खासदार सुब्रमण्यम स्वामी आणि वकील अश्विनी उपाध्याय यांनी उद्देशिकेतील "समाजवादी' आणि "धर्मनिरपेक्ष' या दोन संज्ञांच्या समावेशाला आव्हान



देणाऱ्या याचिका दाखल केल्या आहेत. त्यावर सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्या. संजय कुमार यांच्या घटनापीठाने २२ नोव्हेंबर रोजी आपला निकाल राखीव ठेवला होता. या प्रकारची पहिली याचिका बलराम सिंह

धर्मनिरपेक्षता हा शब्द सर्व धर्मांचा समान आदर करणारे प्रजासत्ताक गणराज्य दर्शवतो. तर समाजवाद या शब्दातून सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक अशा सर्व प्रकारच्या शोषणाचे उच्चाटन करण्याचा प्रजासत्ताकाचा निर्धार दिसतो-

सर्वोच्च न्यायालय

यांनी वकील विष्णू शंकर जैन यांच्यामाफ्फत २०२०मध्ये दाखल केली होती.

या रिट याचिकांवर अधिक विचारविनिमय आणि निवाड्याची गरज नाही. राज्यघटनेत दुरुस्ती करण्याचा संसदेचा अधिकार उद्देशिकेलाही लागू होतो , असे न्या. खन्ना यांनी हा महत्त्वपूर्ण निकाल जाहीर करताना स्पष्ट केले. इतक्या वर्षांनंतर ही प्रक्रिया शून्यवत करता येणार नाही असे या निकालातून स्पष्ट होते, असेही सरन्यायाधीशांनी सांगितले. राज्यघटना स्वीकारण्याच्या तारखेमुळे अनुच्छेद १३८ अंतर्गत सरकारला असलेले अधिकार नाहीसे होत नाहीत आणि त्याला आव्हानही देता येणार नाही असे खंडपीठाने नमूद केले.

न्यायालयाने धर्मनिरपेक्षतेच्या संकल्पनेचा उहापोह करताना शासनाचे धर्मनिरपेक्ष स्वरूप म्हणजे काय हे स्पष्ट केले. व्यापक जनहिताच्या दृष्टीने विकासात आणि समानतेच्या अधिकारात अडथळा आणणाऱ्या धार्मिक प्रथा आणि दृष्टीकोन यामध्ये शासनाला हस्तक्षेप करण्यास धर्मनिरपेक्षता प्रतिबंध करत नाही असे खंडपीठाने सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात संविधान दिन साजरा

गोंदिया: २६ नोव्हेंबर भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या अध्यक्षतेखाली संविधान दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, उपजिल्हाधिकारी मानसी पाटील, जिल्हा पुरवठा अधिकारी सतीश अगडे, जिल्हा खनिकर्म अधिकारी आर.जी. मारबते, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे, जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधीक्षक संजय धार्मिक, लेखाधिकारी सीमा वानखेडे, जिल्हा विधी अधिकारी मिलिंद चौरे यांचेसह जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

याप्रसंगी २६ नोव्हेंबर रोजी मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहिद झालेल्या जवान व नागरिकांना श्रध्दांजली वाहण्यात आली. यानंतर भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी भारत देश जगातील सर्वात मोठी लोकशाही जोपासणारा देश असून २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतातील प्रत्येक नागरिकांच्या संरक्षणासाठी व त्यांच्या अधिकारासाठी हक्काचे व्यासपीठ म्हणजे भारतीय संविधान अंगिकृत करण्यात आले असे त्यांनी यावेळी सांगितले.

भारताचे संविधान उद्देशिकेचे वाचन जिल्हाधिकारी कार्यालयातील अधीक्षक संजय धार्मिक यांनी केले. संविधान दिनाचे औचित्य साधून विधी अधिकारी मिलिंद चौरे यांनी विस्तृतपणे माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन जिल्हा आपत्ती व्यवस्था अधिकारी राजन चौबे यांनी केले.

जोतिबा आकाशाएवढा!

सामाजिक क्रांतीचे प्रणेते महात्मा जोतिराव फुले यांचे स्थान एकूणच मानवी जीवनाच्या इतिहासामध्ये अजरामर झालेले आहेत. त्यांनी केलेले कार्य आणि मानवतावादी दृष्टिकोनातून आयुष्यभर केलेली सामाजिक परिवर्तनाची साधना यामुळे महात्मा जोतीराव फुले यांना खऱ्या अर्थाने 'महात्मा' बिरुदावली शोभून दिसते. महात्मा फुले संपूर्ण हयातभर कार्य करत असताना अनेक प्रसंगांना त्यांना तोंड द्यावे लागले तसेच अनेक प्रसंगी त्यांना अनेक मानसन्मान प्राप्त झाला त्यांच्या हयातीत ह्या घटना त्यांचे अवघे आयुष्य कनकाप्रमाणे तेजस्वी करणाऱ्या ठरल्यास, परंतु त्यांच्यापश्चातदेखिल सामाजिक चळवळीच्या शिलेदारांना आणि एकूणच मानवी समाजाला त्यांचे जीवन प्रेरणादायी ठरणाऱ्या या घटना मानवी इतिहासाची प्रचंड समृद्धी संपन्नता देणाऱ्या होत.

महात्मा फुले यांचे असंख्य चाहते आणि त्यांना काळजात जपणारे तपस्वी अभ्यासक आहेत. प्रसिद्ध संशोधक आणि चरित्रकार धनंजय कीर यांच्या 'महात्मा जोतिराव फुले' या ग्रंथातील त्यांच्या कार्याचा गुणगौरव करणारा एक हृदयस्पर्शी प्रसंग या ठिकाणी मुद्दाम द्यावासा वाटतो.

"जोतीबांच्या गौरवार्थ विश्रामबागवाड्यात १९ नोव्हेंबर १८५२ रोजी सरकारने देशी सर्व सरदार आणि प्रमुख लोक यांची सभा बोलावली होती. समारंभाच्या प्रारंभी मेजर कँडी यांनी सरकारी शिक्षा मंडळीचे निवेदन सभेकडे वाचून दाखवले आणि नंतर सभेचा उद्देश मराठीत कथन केला. भाषणाच्या शेवटी त्यांनी सरकारच्या वतीने जोतिबांना एक शालजोडी (दोनशे रुपये किमतीची) सन्मानपूर्वक अर्पण केली."

जोतिरावांचा हा सन्मान अनेक अर्थाने ऐतिहासिक होता, कारण स्त्रीशूद्रातिशूद्रांच्या शिक्षणासाठी झटणारा पहिला भारतीय पुरुष म्हणून जोतीरावांची उंची त्यामुळे उत्तुंग हिमालयाएवढी झाली. ज्या धर्मग्रंथांनी व चातुर्वर्ण्यव्यवस्थेने स्त्रीशू

५५ टक्के मते महायुतीच्या पारड्यात, तर महाविकास आघाडीला मिळाली ३५.९९ टक्के मते

जिल्ह्यात एकूण ६९.७४ टक्के मतदान, खड्डा कुठे पडला? महाविकास आघाडीकडून मंथन

गोंदिया: विधानसभा निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबरला जाहीर झाला. यात जिल्ह्यातील ६९.७४ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावून चारही मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार निवडून पाठविले. या निवडणुकीत जिल्ह्यातील ५५ टक्के मते महायुतीच्या पारड्यात टाकली तर महाविकास आघाडीच्या उमेदवारांना केवळ ३५.९९ टक्के मते मिळाली. यात लाडक्या बहिणींची भूमिका सुद्धा महत्वपूर्ण राहिली. त्यामुळेच गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव आणि आमगाव या चारही मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार चांगल्या मताधिक्याने निवडून आले.

विधानसभा निवडणूक जिल्ह्यातील चारही मतदारसंघात अत्यंत शांततेत व व्यवस्थित पार पडली. प्रचारापासून तर मतदान व मतमोजणीपर्यंत जिल्ह्यातील जनतेसच उमेदवार व त्यांच्या समर्थकांनी निवडणूक प्रक्रियेचा आनंद घेत लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होऊन मतदानाचा हक्क बजावला.जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव, तिरोडा, गोंदिया व आमगाव या चारही मतदारसंघात चारही जागांवर महायुतीच्या उमेदवारांना जिल्ह्यातील मतदारांनी पहिली पसंती दर्शविली आहे.

तब्बल ५४.९६ टक्के मतदारांनी महायुतीच्या पारड्यात मतदान केले आहे. तर महाविकास आघाडीच्या पारड्यात ३५.९९ टक्के मतदारांनी मतदान केले आहे. सरासरी १९ टक्के मतांच्या फरकाने महाविकास आघाडीला दारुण पराभवाचा परिणामाला समोरे जावे लागले. निवडणूक प्रचाराच्या रणधुमाळीदरम्यान अत्यंत चुरशीची लढत होणार असे चित्र पाहावयास मिळत होते. त्यानुरुप निवडणूक निकालातही चुरस दिसून येणार, अशी अपेक्षाही बाळगली जात होती. निवडणूक निकालाने अपेक्षाभंग केला. चारही विधानसभा क्षेत्रातील रणसंग्रामात महायुतीच्या सर्व उमेदवारांनी महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा धुव्वा ठेवून आहेत.

विनोद अग्रवाल यांचा मताधिक्याचा विक्रम

जिल्ह्यातील चारही मतदारसंघामध्ये प्रचाराच्या रणधुमाळीत चुरशीची लढत दिसत असली तरी निकालाता मात्र एकतर्फा निवडणूक झाल्याचे स्पष्ट झाले. जिल्ह्यातील सरासरी ५५ टक्के मतदान महायुती उमेदवारांच्या पाठीशी भक्कमपणे राहिले. गोंदिया विधानसभा मतदारसंघाचे आ.विनोद अग्रवाल यांनी तब्बल ६१ हजार ४६४ मतांनी विजयी झाले. एकूण मतदानाच्या ६१.२० टक्के मते त्यांना मिळाली. तर प्रतिस्पर्धी उमेदवार गोपालदास अग्रवाल यांना फक्त ३४.८३ टक्के मते घेता आली.

विजय रहांगडाले, संजय पुराम यांचाही रेकॉर्ड

तिरोडा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार विजय रहांगडाले हे मतदारांच्या पसंतीत सलग तिसऱ्यांदा उतरले. रहांगडाले यांना ५७.७८ टक्के मते मिळाली. तर प्रतिस्पर्धी उमेदवार रविकांत बोपचे यांना ३३.८३ टक्के मते मिळाली. आमगाव मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार संजय पुराम यांना ५५.८२ टक्के तर प्रतिस्पर्धी उमेदवार राजकुमार पुराम यांना ३९.२३ टक्के मते घेता आली. तर अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार (रा.काँ.) राजकुमार बडोले यांना ४५.०४ टक्के मत तर प्रतिस्पर्धी उमेदवार दिलीप बन्सोड यांना ३६.०८ टक्के मते मिळाली.

नीता यांना ०.३८, तर वनिता यांना ०.८३ टक्केच

अर्जुनी मोरगाव मतदारसंघात महिला मतदारांची संख्या एक लाख ३९ हजार ९९६ असूनही नीता साखरे यांना फक्त ४३९ मते मिळाली आहेत. ता महिला-पुरुषांचा नक्कीच समावेश असणार यात शंका नाही. मात्र महिला मतदारांची मते गृहीत धरली असता त्यांना फक्त ०.३८ टक्के मतेच मिळाली आहेत. तसेच तिरोडा मतदारसंघात महिला मतदारांची संख्या एक लाख ३८ हजार १७३ एवढी असूनही वनिता ठाकरे यांना एक हजार १४७ मते मिळाली आहेत. म्हणजेच त्यांना ०.८३ टक्केच मते मिळाली आहेत.

दुर्गम नवाटोला गावाला भेट देऊन केली हिवताप अधिकाऱ्यांनी पाहणी

मलेरियाचा संसर्ग वाढू नये यासाठी उपाययोजना, कर्मचाऱ्यांना केल्या सुचना

गोंदिया: जिल्हा हिवताप अधिकारी डॉ, विनोद चव्हाण यांनी सालेकसा तालुक्यातील दरेकसा प्राथमिक आरोग्य केंद्रातील अतिदुर्गम नवाटोला या गावाला भेट देऊन कार्यक्षेत्रात कीटकजन्य कार्यक्रमाची होत असलेल्या कामाची पाहणी केली.

प्राथमिक आरोग्य केंद्र दरेकसा येथील हिवताप दुषित रुग्णांचा आढावा घेऊन उपकेंद्र नवाटोला येथे भेट देऊन अतिदुर्गम नवाटोला या गावातील हिवताप दुषित रुग्णाची विचारपूस करुन दिल्या जात असलेल्या औषधोपचाराची माहिती जाणून कीटकजन्य कार्यक्रमाची पाहणी केली. गावात आशा सेविका व आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत ताप तरुण व कंटेनर शोधमोहिमेची माहिती जाणून घेतली.

कीटकजन्य आजाराबाबत सालेकसा तालुक्यातील दरेकसा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पारस गिरी यांच्यासह आरोग्य संस्थेत उत्तम सेवा देत असल्याबाबत आरोग्य कर्मचाऱ्यांचे राबविण्यात येत असलेल्या कार्याचे समाधान व्यक्त करुन दररोज होत असलेल्या कामाचे पर्यवेक्षण चांगल्या प्रकाराचे करण्याच्या सुचना केल्या. भेटी दरम्यान त्यांच्यासह डॉ, पारस गिरी, आरोग्य पर्यवेक्षक ठाकरे, आरोग्य सहायक किशोर भालेराव उपस्थित होते.

गोंदियातील चार हजार मतदारांना रुचला नाही एकही उमेदवार

गोंदिया:- चार हजार मतदारांना रुचला नाही एकही उमेदवार हेच कारण आहे की, मतदान करताना या मतदारांनी नोटाला पसंती दिल्याचे निकालातून दिसले. विशेष म्हणजे, नोटाला सर्वाधिक पसंती दर्शविणारे एक हजार ४४१ मतदार गोंदिया विधानसभा मतदारसंघातील आहेत.

निवडणूक आयोगाने ज्या मतदारांना एकही उमेदवार पसंतीस पडलेला नाही अशांना मनोटाफ हा पर्याय मतदान यंत्रावर उपलब्ध करून दिला आहे. या पर्यायाचा मोठ्या प्रमाणात उपयोग मतदार करीत असल्याचेही निवडणुकीत दिसून येते. विधानसभा निवडणुकीचा निकाल शनिवारी (दि. २३) लागला असून यामध्ये जिल्ह्यातील तब्बल चार हजार १६० मतदारांनी नोटाला पसंती दर्शविली असल्याचे दिसले.

मतदार संघनिहाय नोटाचा तक्ता

मतदारसंघ	२०२४	२०१९
अर्जुनी-मोरगाव	८०१	२०२७
तिरोडा	७२४	१८४१
गोंदिया	१४४१	१८५२
आमगाव	११९४	१३७९
एकूण	४१६०	७०९९

२०१९ च्या तुलनेत दिसली घट

यंदा जिल्ह्यात जेथे चार हजार १६० मतदारांनी नोटाचा वापर केला आहे. तेथेच मात्र सन २०१९ मध्ये ही संख्या सात हजार ९९ एवढी होती. म्हणजेच, यंदाची आकडेवारी बघता जिल्ह्यात नोटाला पसंती दर्शविणाऱ्या मतदारांची संख्या घटली असल्याचे म्हणणे वावगे ठरणार नाही. विशेष म्हणजे, सन २०१९ च्या निवडणुकीत अर्जुनी-मोरगाव विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक दोन हजार २७ मतदारांनी नोटाला पसंती दर्शविली होती.

उमेदवारांनाही मिळाली नाहीत एवढी मते

यंदाच्या निवडणुकीत तब्बल चार हजार १६० मतदारांनी नोटाला पसंती दर्शविली आहे. विशेष म्हणजे, पक्ष व अपक्ष उमेदवारांनाही एवढी मते मिळाली नसल्याचे दिसत आहे. विशेष म्हणजे, यंदा तब्बल ४० उमेदवारांना एक हजारच्या आतच मते मिळाली आहेत. तर दुसरीकडे मात्र चार हजार १६० मतदारांनी नोटाला पसंती दर्शविणे ही मात्र आश्चर्याची बाब आहे.



गाव विधानसभा मतदारसंघात एक हजार १९४ मतदारांनी नोटा या पर्यायाची निवड केली आहे.

धारदार शस्त्राने वार करत तरुणाची निर्घृण हत्या

गोंदिया : जिल्ह्यातील तिरोडा तालुक्यातील भिवापूर येथील नाल्याजवळ रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या एका तरुणाचा मृतदेह आढळला. अज्ञात मारेकऱ्यांनी त्याच्या डोक्यावर धारदार शस्त्राने वार करून हत्या केल्याची बाब पोलिसांनी केलेल्या मोका पंचनाम्यादरम्यान पुढे आली. सुनील चंद्रकुमार तुमळे (३२) रा. भुराटोला असे मृतक तरुणाचे नाव आहे.

तिरोडा तालुक्यातील भुराटोला येथील सुनील तुमळे याच्या गावापासून ७ किलोमीटर अंतरावर असलेल्या भिवापूर गावाच्या परिसरात मुख्य रस्त्यापासून ५० फूट आत त्याचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात आढळला.

मृत तरुण हा आपल्या मोटरसायकल ने भिवापूर परिसरात गेला होता. पण तो घरी परतला नाही. त्याची मोटारसायकल रस्त्यालगत उभी होती. अज्ञात मारेकऱ्यांनी त्याच्या डोक्यावर धारदार शस्त्राने तीन घाव घातले. यात एक घाव खोलवर तर दोन घाव सामान्य होते. यात त्याचा मृत्यू झाला. या घटनेसंदर्भात त्याची आई चंद्रकला चंद्रकुमार तुमळे (५२) यांच्या तक्रारीवरून तिरोडा पोलिसांनी कलम १०३ (१) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

गोरेगाव शहरातील ५५७ घरकूल लाभार्थ्यांची अडचण झाली दूर

गोरेगाव: स्थानिक नगर पंचायत अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना शहरामधील लाभार्थ्यांची आर्थिक अडचण दूर झाली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत गोरेगाव नगरपंचायत क्षेत्रातील डीपीआर क्र.१, २ मध्ये ५५७ लाभार्थींना घरकूल बांधकामाची मंजुरी मिळाली होती. आ. विजय रहांगडाले व माजी नगराध्यक्ष आशिष बारेवार यांच्या कार्यकाळात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांची निवड करण्यात आली होती. आता त्यांच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्याची संधी मिळाली.

या योजनेंतर्गत लाभार्थ्यांनी घरकूल बांधकाम केले होते. परंतु २०१९ ते २०२२ पर्यंत सरकार बदलल्यामुळे या लाभार्थ्यांचे २ कोटी ५० लक्ष रुपयांमधून अंतिम हप्ता तीस हजार रुपे अप्राप्त होता. यामुळे हे सर्व लाभार्थी आर्थिक अडचणीत सापडलेले होते व याबाबत त्यांनी सतत माजी नगराध्यक्ष आशिष बारेवार यांच्याकडे पाठपुरावा केला.

बारेवार यांनी याची दखल घेत ही मागणी आ.विजय रहांगडाले यांच्याकडे लावून धरली. विजय रहांगडाले यांनी ११ जुलै २०२४ ला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे भेट घेतली. प्रधानमंत्री आवास योजना शहरी अंतर्गत तिरोडा, गोरेगाव विधानसभा मतदारसंघातील लाभार्थ्यांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली.

याबाबत मुख्यमंत्री यांनी आश्वासन दिले की लवकरच सर्व लाभार्थ्यांना त्यांची थकीत असलेली अंतिम हप्त्याची रक्कम प्राप्त होईल. त्यानंतर आता नगरपंचायत गोरेगावलव प्रधानमंत्री आवास योजनेतील २ कोटी १५ लाख रुपयांची थकीत रक्कम प्राप्त झाली आहे. लाभार्थ्यांची थकीत असलेली तीस हजारांची अंतिम हप्त्याची रक्कम मिळाल्याने त्यांची अडचण दूर झाली आहे.

या गोष्टींची पूर्णता करणे गरजेचे

प्रधानमंत्री योजनेंतर्गत अंतिम टप्प्यामध्ये शासकीय नियमानुसार योजनेचे नाव, सदर लाभार्थ्यांचे नाव व त्याचे क्रमांक घराच्या भिंतीवर लिहून त्याचा फोटो अभियंत्याने घेऊन त्याच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घराचे बांधकाम पूर्ण झाले, याची ऑनलाईन पद्धतीने जिओ टॅग करुन नोंद घेणे गरजेचे आहे.

लाभार्थ्यांच्या खात्यावर रक्कम जमा

घरकूल योजनेच्या ५५७ लाभार्थ्यांपैकी २९५ लाभार्थ्यांची अंतिम हप्त्याची रक्कम प्राप्त झालेली आहे. ही रक्कम प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा केलेली आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी कुठल्या अफवांवर विश्वास न ठेवता नियमानुसार आपली सर्व कायवाही पूर्ण करुन अभियंता नगरपंचायत गोरेगाव यांच्याकडे आपल्या घराचे पूर्णत्व झाल्याची सुचना द्यावी. जेणेकरुन सर्व लाभार्थ्यांचे अंतिम हप्त्याचे ३० हजार रुपये सगळ्या लाभार्थ्यांना प्राप्त होतील, असे आ.विजय रहांगडाले व माजी नगराध्यक्ष आशिष बारेवार यांनी कळविले आहे.

तिरोडा मतदारसंघात उमेदवारांना बुथनिहाय मते

बुथ	राकाँ (शपग)	भाजप
सावरा	१२४	२८४
पिपरिया	२०१	३८३
चांदोरी खु.	२४९	४०७
चांदोरी खु.	१२०	२७६
खैरलांजी	२९६	३३३
अर्जुनी	१८२	४९१
अर्जुनी	१३४	३९९
अर्जुनी	१६६	३१६
फगुनाटोला	१४६	२६६
किंडगीपार	१२८	३०१
परसवाडा	२३४	३९८
परसवाडा	१५७	२५१
बघोली	१५३	२७०
बिहीरिया	२९८	३०५
इंदोरा बु.	१६४	२९६
इंदोरा बु.	१८३	२८८
करटी खु.	११५	५१६
मरारटोला	१७५	४६९
कवलेवाडा	१९९	४५७
कवलेवाडा	१५२	५६२
कवलेवाडा	२०४	५४२
मुंडीपार	१७३	५१६
मांडवी	२८०	५६४
चांदोरी बु.	२४९	४८१
घाटकुरोडा	२२७	३००
घाटकुरोडा	२०२	३९५
घोगरा	१३६	३४०
घोगरा	१६३	१८५
पुजारीटोला	३०६	३२८
करटी बु.	५७	३५५
करटी बु.	५१	३१६
करटी बु.	१९५	२४४
डब्बेटोला	७७	५१०
बोरा	२६३	३५०
बोरा	१७९	३१३
गोंडमोहाडी	२८८	३६५
गोंडमोहाडी	१४६	२७७
मुरदाडा	२३४	५३८
मुरदाडा	१७६	५४५
महालगाव	११२	६५८
महालगाव	१६२	४२६
धापेवाडा	२०४	५४९
धापेवाडा	१९९	५१९
लोधीटोला	१३४	३७९
लोधीटोला	१४७	२६२
अत्री	११२	२१३
अत्री	८४	३८५
बोदा	१९२	२७७
बोदा	१८८	३२४
सोनेगाव	१२४	३४५
सोनेगाव	८८	३२६
पालडोंगरी	२२६	६१४
पालडोंगरी	२५९	४८९
चिरेखनी	१८३	२९५
चिरेखनी	१४५	५८०
बेलाटी बु.	१६०	४७०
सालेबर्डी	३३४	४९९
भंभोडी	२०७	४२५
मुंडीकोटा	२३०	३७३
मुंडीकोटा	१८४	१६९
मुंडीकोटा	१९३	२३४
पाटीलटोला	१६४	१४८
नवेगाव खु.	३३५	३४१
येळमाकोट	१९६	३१५
पांजरा	२६५	४२४
सरांडी	२५९	४२९
सरांडी	१९७	४७०
खुरखुडी	१७८	३८१
उमरी	१२९	३१३
तिरोडा	२५७	१९६
तिरोडा	३१०	२९६
तिरोडा	१६८	२७५
तिरोडा	२२०	५८२
तिरोडा	३७७	३०९
तिरोडा	२६९	२१४
तिरोडा	३१४	१९७

बुथ	राकाँ (शपग)	भाजप
तिरोडा	४०६	२५४
तिरोडा	३६२	२८९
तिरोडा	१०२	३७०
तिरोडा	११२	४३१
तिरोडा	१४३	२९४
तिरोडा	२१३	२९९
तिरोडा	१७४	२६५
तिरोडा	२७८	२५९
तिरोडा	१९४	२६९
तिरोडा	१४३	३७०
तिरोडा	१८४	५७५
तिरोडा	१५०	५५५
तिरोडा	२५४	३५४
तिरोडा	२०८	४२५
बेलाटी खु.	१५४	३४९
बेलाटी खु.	१९४	२५१
बेरडीपार	८२	३६७
बेरडीपार	१०८	३७३
बेरडीपार	२२०	४५४
नहरटोला	५७	३९१
सेजगाव	२१८	४५२
सेजगाव	२५८	३७६
दवनीवाडा	२०९	५३१
दवनीवाडा	२०६	४१४
दवनीवाडा	१६९	२८५
कारुटोला	७६	२७३
देऊटोला	२३७	३२९
पिपरटोला	५८	३४३
खळबंदा	२३७	३४४
आकोडीटोला	१०३	३८१
जमुनिया	२२३	६११
खैरबोडी	१८०	३७०
खैरबोडी	१९८	२८४
विहीरगाव	१२१	१८९
विहीरगाव	१६२	१७५
इसापूर	१४१	१४२
केसलवाडा	२१६	३६८
केसलवाडा	२२९	२७३
मनोरा	१६८	३२४
सेलोटपार	२२३	३६३
खोपडा	२२५	२५०
बिरसी	२३७	३१२
बिरसी	२४७	२१४
चुरडी	२११	३८७
चुरडी	२११	३२४
गुमाधावडा	१५४	४३९
गुमाधावडा	२१६	२४४
काचेवानी	२३१	४२६
काचेवानी	२९३	४५९
एकोडी	१४४	६०३
एकोडी	१९२	४४६
एकोडी	१३५	५३०
सहेसपूर	२५४	४६५
सहेसपूर	१२०	२११
वळद	११०	२८४
खातीटोला	१७९	४४२
दांडेगाव	१४६	४३०
दांडेगाव	२००	३४६
दांडेगाव	२०४	१६२
बरबसपुरा	२९६	४४८
मेंदीपूर	२५२	४२६
गराडा	२३१	४१४
गराडा	१५६	२४२
मलपूरी	१७३	५९७
खोडगाव	१२०	२०४
बयवाडा	१६९	२३७
मुरपार	६८	२७२
मुरमाडी	२१०	४४३
सोनेखारी	३५६	४७६
सिल्ली	२१३	२४१
सिल्ली-नि.	१८०	३४०
गांगला	२२१	३४३
बोपेसर	२७५	३६१
पारडीबांध	७०	२९९
पारडीबांध	२००	३८०

बुथ	राकाँ (शपग)	भाजप
किंडगीपार	१५५	४५०
मजीतपूर	१८९	२९६
मजीतपूर	२२३	१८०
खमारी	२६३	४८८
मेंढा	१९९	४७७
मेंढा	१८३	४५९
नवरगाव	१९९	३८७
लेदडा	१११	२२२
नवेझरी	३६४	३०६
खेडेपार	६०	२८१
सितेपार	२९६	३१४
सि.-कुलपा	१५१	२५५
कोयलारी	२४३	३२०
कोयलारी	११६	२९५
माल्ही	२६०	३३७
सतोना	२०४	२७०
सतोना	१३७	२६०
वडेगाव	२३९	४७७
वडेगाव	२९५	२९९
वडेगाव	२७२	२५४
वडेगाव	२९७	२१७
सुकडी-डा.	१८७	२९२
सुकडी-डा.	१३०	२७६
सुकडी	२३३	२७३
डोंगरगाव	७६	३७७
डोंगरगाव	१३५	१७८
खडकी	१६०	३८६
इंदोरा खु.	५९	२२१
इंदोरा खु.	०९	१४७
इंदोरा खु.	४१	२९०
निमगाव	१०१	२०३
डोंगरगाव	१४४	३६९
डोंगरगाव	१५८	४२६
भानपूर	१४२	४२५
भानपूर	१७८	५९४
कोहका	१९४	५१५
सेजगाव खु.	२१६	५४९
गंगाझरी	२६१	५२१
गंगाझरी	३९३	३४१
बेरडीपार खु.	९१	४५७
बोरगाव	११५	१७०
लो.नांदलपार	२४१	४८१
कोडेलोहारा	२८६	२३३
कोडेलोहारा	२६२	२२८
सर्रा	१३३	३११
मारेगाव	१४३	१७९
भजेपार-गोंडीटोला	२६५	१९३
भजेपार-गोंडी.	८३	२८७
भजेपार-गोंडी.	२०७	२५७
खुर्शीपार	१०३	३४४
आ.-बालापूर	१७९	२६१
बोदलकसा	२७०	३५९
ख.-बैरागीटोला	२६४	४२४
फतेपूर	१८०	४०४
मुंडीपार	१३३	२६९
मुंडीपार	१८१	४९६
पिंडकेपार	१७६	३४६
लेंडेझरी	१९४	३०१
मंगेझरी-गोविंद	५१८	२१२
चोरखमारा	१४२	१६६
सोनेगाव	२९६	४४६
शहारवाणी	२६१	३८१
शहारवाणी	२२३	५२६
गोंदेखारी	३२५	२४०
बागडबंध नवर.	२०७	१९८
आसलपाणी	२३८	१९०
बोरगाव	२७७	४८२
बोरगाव-सु.	३२१	२८८
कवलेवाडा	१६३	५०३
कवलेवाडा	१२५	३६२
कवलेवाडा	२७२	५१२
डव्वा	२८५	३४०
डव्वा	२०५	४४१
सटवा	२५७	४८०
चिचगावटोला	२०१	३४६

बुथ	राकाँ (शपग)	भाजप
खाडीपार	२४०	५२२
बोळूंदा	४५५	३७४
तिमेझरी	१४१	३१७
तिमेझरी	१८९	२३९
बघोली	१८७	४४२
चिचगाव	२१२	४३७
गणखैरा	२७०	२०७
गणखैरा	१५०	३५३
गणखैरा	२६१	३२६
पूरगाव	२०४	३४१
पूरगाव	३०१	२७०
सिलेगाव	२२२	३१०
सिलेगाव	१८५	१५०
कुन्हाडी	२३५	३३०
कुन्हाडी	१८९	३९५
कुन्हाडी	१२६	३८५
हिरापूर	२०४	४९४
हिरापूर	२२७	५२१
रामाटोला	१६९	३८३
मलपूरी	१७३	१९३
पठारी	२७६	३१३
पठारी	३३०	३९३
मेंगाटोला	३९२	४५८
तुमखेडा बु.	३६३	३३९
तुमखेडा बु.	५५३	३९६
कटंगी बु.	२६६	४२९
कटंगी बु.	२४८	३५१
कटंगी बु.	१४५	१३८
गोरेगाव	२५०	४५५
गोरेगाव	२४९	२९७
गोरेगाव	२०१	३५४
गोरेगाव	२३९	२२३
गोरेगाव	२१५	३०३
गोरेगाव	२१४	२८२
गोरेगाव	२२२	२१४
गोरेगाव	२२७	१८४
गोरेगाव	३२३	४६०
हिरडामाली	२५५	१४९
हिरडामाली	१७५	१८३
हिरडामाली	२१०	१५८
हिरडामाली	२१८	१८३
मोहगाव बु.	३३१	४७१
मोहगाव बु.	३३४	२९६
सर्वाटोला	३३३	३००
सर्वाटोला-धुंदा.	११३	१२८
झालीया	२९०	२४९
घोटी	१९८	१७७
घोटी	१९७	१२८
घोटी	३२७	२३१
लाखेगाव	२६९	३१८
ला-गुलाबटोला	१६४	२८१
ठाणेगाव	२४०	४४४
ठाणेगाव	२०१	५५३
चिखली	१२९	४५८
चिखली	१०४	३७७
भिवापूर	१९७	४२९
धामणेवाडा	१६९	३३६
धा.-सोना	१५५	२०१
गहेलाटोला	३११	३४५
दवडीपार	१२९	२५२
दवडीपार	२६५	२६०
बोटे	१६६	२३५
बोटे	२४७	२१६
सोनी	१२९	३०३
सोनी	११२	२१०
सोनी	१७१	१९४
सोनी	१६७	१२२
नोनीटोला	१७०	३४६
पोस्टल बॅलेट	५५६	६७१
एकूण	६०,२९८	१,०२,९८४

राष्ट्रवादी काँग्रेसचे राजकुमार बडोले, भाजपचे विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले व संजय पुराम विजयी

गोंदिया :- महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघातील निवडणूकीची मतमोजणी २३ नोव्हेंबर रोजी करण्यात आली. ६३-अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) उमेदवार राजकुमार बडोले, तिरोडा विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाचे उमेदवार विजय रहांगडाले, गोंदिया विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाचे उमेदवार विनोद अग्रवाल आणी आमगाव विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाचे उमेदवार संजय पुराम विजयी झाले.त्यांना संबंधीत विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधीकारी यांचे हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघातून एकूण १९ उमेदवारांनी निवडणूक लढविली. या निवडणूकीत २ लाख ५८ हजार ९६६ मतदारांपैकी १ लाख ८१ हजार २८६ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार राजकुमार बडोले यांना ८२ हजार ५०६ व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे उमेदवार दिलीप बन्सोड यांना ६६ हजार ९१ मते पडली. राजकुमार बडोले यांनी दिलीप बन्सोड यांचा १६ हजार ४१५ मतांनी पराभव केला. यामध्ये नोटाला ८०१ मते पडली.

तिरोडा विधानसभा मतदारसंघातून एकूण २१ उमेदवारांनी निवडणूक लढवीली.

या निवडणूकीत २ लाख ७१ हजार ७९ मतदारांपैकी १ लाख ७६ हजार ७५१ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. भारतीय जनता पक्षाचे उमेदवार विजय रहांगडाले यांना १ लाख २ हजार ९८४ व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) उमेदवार रविकांत बोपचे यांना ६० हजार २९८ मते पडली. विजय रहांगडाले यांनी रविकांत बोपचे यांचा ४२ हजार ६८६ मतांनी पराभव केला. यामध्ये नोटाला ७४७ मते पडली.

गोंदिया विधानसभा मतदारसंघातून एकूण १५ उमेदवारांनी निवडणूक लढवीली. या निवडणूकीत ३ लाख २५ हजार ५५६ मतदारांपैकी २ लाख ३१ हजार ३८५ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. भारतीय जनता पक्षाचे उमेदवार विनोद अग्रवाल यांना १ लाख ४३ हजार १२ व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे उमेदवार गोपालदास अग्रवाल यांना ८१ हजार ४०४ मते पडली. विनोद अग्रवाल यांनी गोपालदास अग्रवाल यांचा ६१ हजार ६०८ मतांनी पराभव केला. यामध्ये नोटाला १४७१ मते पडली.

आमगाव विधानसभा मतदारसंघातून एकूण ९ उमेदवारांनी निवडणूक लढवीली. या निवडणूकीत २ लाख ६९ हजार ४९९ मतदारांपैकी १ लाख ९५ हजार १८४ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. भारतीय जनता पक्षाचे उमेदवार संजय पुराम यांना १ लाख १० हजार १२३ व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे उमेदवार राजकुमार पुराम यांना ७७ हजार ४०२ मते पडली. संजय पुराम यांनी राजकुमार पुराम यांचा ३२ हजार ७२१ मतांनी पराभव केला. यामध्ये नोटाला ११९४ मते पडली.

तिरोड्याची जागा भाजपने कायम ठेवली आहे.अर्जुनी मोरगाव येथून जिल्ह्याचे माजी पालकमंत्री राजकुमार बडोलेंनी विजय मिळवित राष्ट्रवादी काँग्रेसची जागा कायम ठेवली. आमगाव येथून राजकुमार पुराम व गोंदियातून विद्यमान आमदार गोपालदास अग्रवाल यांना पुन्हा पराभव पत्करावा लागला. विशेष म्हणजे सलग १५ वर्ष विधानसभेत जाणारे गोपालदास अग्रवाल पाचव्यांदा पक्ष बदलाने पराभूत झाले.

गोंदिया विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार गोपालदास अग्रवाल यांच्या प्रचाराकरीता राहुल गांधी यांची सभा घेण्यात आली होती.मात्र राहुल गांधी यांच्या सभेचा प्रभाव मतदारावर जाणवला नाही.

धनलक्ष्मी योजनेतून ३००० हजाराची घोषणा करुनही महिला मतदारांनीच नव्हे तर दलीत, आदिवासी मुस्लीम महिला मतदारांनीही त्यांच्या या घोषणेकडे कानाडोळा केल्याचे दिसून आले.

गोंदिया जिल्ह्यातील ४ विधानसभा मतदारसंघाचे निकाल हाती आले असून यावेळी गोंदियाच्या इतिहासात नवी नोंद झालेली आहे. आजपर्यंतच्या निवडणुकीत कधीही गोंदिया विधानसभा मतदारसंघातून कधीही भाजप उमेदवार निवडून कधीही आलेला नव्हता. हा इतिहास मात्र या मतदारसंघात यावेळी ६२ वर्षानंतर बदलेला आहे. व नव्या इतिहासाची नोंद झाली आहे. आमदार विनोद अग्रवाल यांच्या माध्यमातून कमळ फुलविण्याचे भाजप नेत्यांचे स्वप्न पुर्ण झाले आहे.

तिरोडा मतदारसंघात राष्ट्रवादीच्या बाजुने वातावरण असतांना त्याठिकाणी राष्ट्रवादीला विजय मिळविता आला नाही. उलट भाजपला पुन्हा विजय मिळविता आला. भाजपने ही जागा कायम ठेवत ४२ हजाराच्या मताधिक्याने निवडणूक जिंकली.याठिकाणी भाजप उमेदवाराना पहिल्या फेरीपासून २१०० ने जी आघाडी घेतली त्यात प्रत्येक फेरीत वाढ होत चालली तर राष्ट्रवादीच्या उमेदवाराला कुठेही आघाडी घेता आली नाही.मतदारसंघातील वातावरण बघता निकाल अनेपक्षित लागला.

२०१४ मध्ये काँग्रेस १ व भाजप ३ जागा ,
२०१९ मध्ये भाजप १,काँग्रेस १,राष्ट्रवादी १ व अपक्ष १
२०२४ मध्ये भाजप ३, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार १

बंडखोराचा परिणाम नगण्य

गोंदिया जिल्ह्यातील ४ विधानसभा मतदारसंघापैकी अर्जुनी मोरगाव व आमगाव विधानसभा मतदारसंघात भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अप) व काँग्रेसच्या नेत्यांनी अधिकृत उमेदवाराविरुध्द बंडखोरी केली होती. मात्र या बंडखोराचा परिणाम या दोन्ही मतदारसंघात फारसा पडल्याचे जाणवले नाही. ज्या पध्दतीने महायुतीच्या उमेदवारांनी आघाडी घेतली, ती आघाडी कमी करण्याकरीता बंडखोरांनी मतदारांवर फारसा प्रभाव न पाडल्यानेच दोन्ही मतदारसंघात बंडखोरांचा परिणाम नगण्य राहीला.

गोंदियात राहूल गांधीची सभा, मात्र काँग्रेसचा पराभव, मनसे, वंचित बसपचा प्रभाव नगण्य

गोंदिया जिल्हयातील ४ ही मतदारसंघात बहुजन समाज पक्षाने आपले उमेदवार रिंगणात उतरवले होते. मात्र बसपला पाहिजे त्याप्रमाणात मतदारांनी यावेळी स्विकारलेले दिसून आले नाही. ओबीसी चेहऱ्यासह उमेदवार रिंगणात उतरवूनही बसपला लाभ झालेला नाही. मनसेच्यावतीने गोंदिया विधानसभा मतदारसंघात ओबीसी चेहरा देण्यात आला, परंतु त्याचाही काही फारसा लाभ मनसेला झालेला नाही. वंचित बहुजन आघाडीनेही उमेदवार उतरविल्याने काँग्रेस बसपच्या मतांचे विभाजन थोड्या फार प्रमाणात झाले असले तरी ते प्रभाव पाडणारे नाही. गोंदिया जिल्ह्यातील कुठल्याही मतदारसंघात एमआयएमचा उमेदवार रिंगणात नसल्याने त्याचा फटका येथे बसलेला नाही. पारंपरिक ज्या पक्षाना जो मतदान जायचा तो गेला मात्र गोंदियात यावेळी दलित, आदिवासी व मुस्लीम महिला मतदार लाडक्या बहिणीकडे व सरसकट बघितल्यास डीबीटी(डायरेक्ट खात्यात पैसे)येत असल्याने महायुतीकडे गेल्याचे दिसून आले.

एकषष्ठांशही मते नाहीत, ५६ जणांचे डिपॉझिट जप्त

एकूण मतदानाच्या एकष्ठांश मते आवश्यक, आठच उमेदवार वाचवू शकले डिपॉझिट



गोंदिया:- जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघात एकुण ६४ उमेदवार रिंगणात होते व त्यांना डिपॉझिट (अनामत रक्कम) वाचविण्यासाठी प्रत्यक्ष झालेल्या एकूण वैध मतदानाच्या एकषष्ठांश मते मिळविणे आवश्यक होते. मात्र या लढ्यात चारही विधानसभा मतदारसंघात फक्त आठच उमेदवार आपले डिपॉझिट वाचवू शकले आहेत. तर अन्य ५६ उमेदवारांनी हा आकडा गाठला नसल्याचे त्यांचे डिपॉझिट जप्त होणार आहे.

निवडणूक प्रचारादरम्यान अनेक उमेदवारांकडून प्रतिस्पर्धी उमेदवाराचे डिपॉझिट जप्त करु, अशी गर्जना केली जाते. डिपॉझिट जप्त म्हणजे नामुष्कीजनक पराभव मानला जातो. एकूण वैध मतांच्या एकषष्ठांशही (१६.६६ टक्के) मते जे मिळवू शकत नाहीत, त्यांचे डिपॉझिट जप्त होते. यंदा जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघात एकूण ६४ उमेदवार रिंगणात होते. यामध्ये तब्बल ३६ उमेदवारांनी अपक्ष निवडणूक लढविली. निकालात महायुतीने सर्वांनाच चारीमुंड्या चीत केले असतानाच विजयी व थेट विरोधात अशा एकूण आठ उमेदवारांनाच आपले डिपॉझिट वाचविता आले आहे.

चार मतदारसंघात एकूण ६४ उमेदवार

जिल्ह्यात चार विधानसभा मतदासंघ असून या चारही विधानसभा मतदारसंघातून एकूण ६४ उमेदवारांनी आपले भाग्य आजमाविले. मात्र यातील तब्बल ६५ उमेदवार डिपॉझिटसाठी ठरलेली आकडेवारी गाठू शकलेले नाहीत.

५६ जणांचे डिपॉझिट जप्त

जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारंघातून एकूण ६४ उमेदवार रिंगणात उतरले होते. यातील फक्त आठ उमेदवारांनच आपले डिपॉझिट वाचविता आले आहे. उर्वरित ५६ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे.

एकषष्ठांश मते घ्यावी लागतात.

उमेदवारांना आपले डिपॉझिट वाचविण्यासाठी एकूण वैध मतांच्या एकषष्ठांश म्हणजेच १६.६६ टक्के मते घ्यावी लागतात व तेव्हाच त्यांचे डिपॉझिट वाचते.

जिल्ह्यातून प्रथमच काँग्रेस झाली भुईसपाट

गोंदिया:- एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोंदिया जिल्ह्यात या विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव झाला. जिल्ह्यातील चारपैकी एकही जागा कायम ठेवण्यात काँग्रेसला यश आले नाही. त्यामुळे जिल्ह्यातून काँग्रेस प्रथमच भुईसपाट झाली. सहा महिन्यांपुर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीतील यशाने काँग्रेसला हुरुप आला होता. व कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला होता. पण हा उत्साह विधानसभा निवडणुकीत कायम ठेवण्यात काँग्रेसला अपयश आले. त्यामुळेच जिल्ह्यात काँग्रेस पक्षाच्या झालेल्या पाणीपतवर काँग्रेस नेते मंथन करणार का असा सूर राजकीय वर्तुळात निकालानंतर उमटत आहे.

सन १९७८ पासून झालेल्या विधानसभा निवडणुकांवर नजर टाकल्यास प्रत्येक निवडणुकीत जिल्ह्यात काँग्रेसचे वर्चस्व कायम राहिले.चार मतदारसंघापैकी कधी दोन तर कधी तीन जागांवर काँग्रेस विजय प्राप्त केला होता. त्यातच

गोंदिया विधानसभा मतदारसंघ हा तर काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. या मतदारसंघात आतापर्यंत झालेल्या निवडणुकांमध्ये काँग्रेस, शिवसेना वगळता भाजपचा कधी विजय झाला नव्हता, पण या निवडणुकीत भाजपचे आ.विनोद अग्रवाल यांनी ६१ हजार मतांनी विजय प्राप्त करुन या मतदारसंघात प्रथमच कळम फुलवित इतिहास रचला. आमगार मतदारसंघात गेल्या निवडणुकीत काँग्रेसचे वर्चस्व होते. या निवडणुकीत काँग्रेसने विद्यमान आ.सहषराम कोरोटे यांचे तिकीट कापत अत्यंत नवखा चेहरा राजकुमार पुराम यांना उमेदवारी देण्याचा अति आत्मविश्वासाने प्रयोग केला. हा प्रयोगसुद्धा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा फसला.

तर अर्जुनी मोरगाव मतदारसंघात स्थानिक पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या प्रचंड विरोधानंतरही मतदारसंघाबाहेरील चेहरा दिला.प्रचाराचा शेवटच्या टप्प्यात काँग्रेसने अंतर्गत वादावर पडदा टाकून एकदिलाने काम केले, पण तोपर्यंत बरेच पाणी वाहून गेले होते तर मतदारांमध्ये जो संदेश जायचा तो गेलाच, मतदारांनी मतदारसंघाबाहेरील चेहरा नाकारला. त्यामुळे काँग्रेसने केलेले हे दोन्ही प्रयोग फसले. तर गोंदिया विधानसभा मतदारसंघात विकास आणि कंत्राटदार नावावर केलेला प्रचारसुद्धा मतदारांना भावला नाही. उलट मतदारांनी या मतदारसंघाचे आ.विनोद अग्रवाल यांच्यावर गेल्या निवडणुकीपेक्षा अधिक विश्वास व्यक्त करीत ६१ हजार मताधिक्यांनी निवडून दिले. यातून जो संदेश जायचा तो गेलाच पण यातून आता काँग्रेस नेमका काय बोध घेते हे देखील महत्वपूर्ण ठरणार आहे.

पराभवानंतर अंतर्गत खदखद बाहेर

गोंदिया जिल्ह्यात काँग्रेसच्या पराभवाला केवळ प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा आत्मविश्वास असल्याची टीका आता काँग्रेसमधून होऊ लागली आहे. कालपर्यंत पटोलेंच्या सतत आजूबाजूला असणारेच आता त्यांच्यावर टीका करीत त्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न करीत आहे. तर काही काँग्रेसचे प्रामाणिक कार्यकर्ते नानाभाऊंचे चुकलेच असे खासगीत बोलू लागले आहे. त्यामुळे जिल्ह्यात काँग्रेसचे पाणीपत झाल्यानंतर अंतर्गत खदखद बाहेर येऊ लागली आहे.

सहषराम कोरोटे प्रचारांपासून दुरच

आमगाव विधानसभा मतदारसंघाचे माजी आ.सहषराम कोरोटे यांचे तिकीट पक्षाने ऐनवेळी कापल्याने ते प्रचंड नाराज होते. प्रचारात फिरलो आणि काँग्रेसचा उमेदवाराचा पराभव झाला तर त्याचे खापर आपल्यावरच फोडले जाईल त्यामुळे ते प्रचारापासून दूर राहिले. यामुळे मतदारसंघात जो संदेश जायचा तो गेलाच व नवख्या चेहऱ्याला संधी देणे काँग्रेस प्रदेशाध्यक्षांना अंगाशी आले.

काँग्रेसमध्ये कोण घालणार उत्साहाची फुंकार

लोकसभा निवडणुकीतील यशाचे जिल्ह्यातील काँग्रेस नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला होता. पण विधानसभेतील पराभवानंतर पुन्हा नैराश्य पसरले आहे. हे नैराश्य दूर करण्यासाठी आता कोण फुंकार घालणार याची चर्चा आहे. विजयाचे जसे भागीदार सर्व भागीदार असतात ते पराज्याचे भागीदार होऊन जिल्ह्यातील काँग्रेसजण पुन्हा एकदिलाने कामाला लागणार का याकडे नजरा लागल्या आहेत.

नवीन चेहरा,अंतर्गत विरोधाने महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा झाला पराभव

लाडक्या बहिणींची लाट ठरली महत्वपूर्ण, अतिआत्मविश्वास नडला, लोकसभेतील विजयाचा हुरुप मावळला

गोंदिया:- विधानसभा निवडणुकीच्या निकाल शनिवारी (दि.२३) लागला आहे. या निकालाने जिल्ह्यातील महाविकास आघाडीतील काँग्रेसचे उमेदवार गोपालदास अग्रवाल, दिलीप बन्सोड, राजकुमार पुराम आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे रविकांत बोपचे या चारही उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला. या चारही उमेदवारांच्या पराभवानंतर गावांतर्गत मंथन सुरु झाले असले तरी ऐनवेळी नवीन चेहरा देणे, विरोधानंतरही मतदारसंघाबाहेरील उमेदवार देणे, पक्ष बदल करुन घरवापसी केल्यानंतर मतदारसंघातील मतदारांचा विश्वास संपादन करण्यास मिळालेला अल्प कालावधी आणि लाडकी बहीण लाटेमुळेच महाविकास आघाडीच्या चारही उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला.

सहा महिन्यांपुर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार खा.डॉ.प्रशांत पडोळे यांना चांगले मताधिक्य मिळाले होते तर काँग्रेससाठी अनुकूल वातावरण सुद्धा तयार झाले होते. काँग्रेस कार्यकर्ते, पदाधिकारी सुद्धा नव्या दमाने कामाला लागले होते. पण हा सहा महिन्यांतच हा उत्साह मावळल्याचे चित्र शनिवारी झालेल्या विधानसभेच्या निकालानंतर स्पष्ट झाले. महाविकास आघाडीतील काँग्रेसने सुरुवातीला चारही मतदारसंघावर दावा करित मोर्चेबांधणी सुरु केली होती. त्यानंतर मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला तिरोड्याची एक जागा सोडत गोंदिया, आमगाव आणि अर्जुनी मोरगाव मतदारसंघातून काँग्रेसचे उमेदवार दिले. पण आमगाव मतदारसंघात काँग्रेसने विद्यमान आ.सहषराम कोरोटे यांचे तिकीट कापून ऐनवेळी नवखा चेहरा राजकुमार पुराम यांना उमेदवारी दिली. त्यामुळे त्यांना जनसंपर्क साधण्यात कमी कालावधी मिळाला. मतदारसंघातील मतदारांपर्यंत पोहोचून ते त्यांच्या योजना पटवून देण्यात अपयशी ठरले. तर विद्यमान आ.सहषराम कोरोटे यांनी प्रचारात तटस्थ भुमिका घेत प्रचारापासून दूर राहिले. यामुळेच भाजपचे उमेदवार संजय पुराम यांनी त्यांचा तब्बल ३२ हजार ७२१ मतांनी पराभव केला. तर अर्जुनी मोरगाव मतदारसंघातून मतदारसंघाबाहेरील उमेदवार दिलीप बन्सोड यांना स्थानिक विरोधानंतर प्रदेशाध्यक्षांनी स्वतःच्या बालहट्टामुळे उमेदवारी दिली. त्यामुळे पक्षात झालेली बंडखोरी आणि प्रचारात मनापासून न सहभागी झालेले पदाधिकारी व कार्यकर्ते यामुळे दिलीप बन्सोड यांचा राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार राजकुमार बडोले यांनी १६४१५ मतांनी पराभव केला.

तर गोंदिया विधानसभा मतदारसंघात माजी आ.गोपालदास अग्रवाल यांनी ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसमध्ये घरवापसी केली. परिणामी त्यांना मतदारसंघात बांधणी करण्यास आणि पदाधिकारी, कार्यकर्ते मतदार यांच्यात विश्वास निर्माण करण्यास कमी कालावधी मिळाला. त्यांनी केवळ मतदारसंघाचा विकास, विद्यमान आमदारावर कंत्राटदारीचे केलेले आरोप हे मतदारांना रुचले नाही. शिवाय महाविकास आघाडीने घोषित केलेल्या पंचसुत्री कार्यक्रमाशिवाय दुसरे ठोस काही सांगण्यासारखे नव्हते. उलट भाजपचे उमेदवार विनोद अग्रवाल यांनी गेल्या पाच वर्षात विकासकामे, मतदारांची बांधणी करुन विश्वास संपादन केला होता.

या सर्व गोष्टीमुळे त्यांनी काँग्रेस उमेदवार गोपालदास अग्रवाल यांचा तब्बल ६१४६४ मतांनी पराभव केला. तर तिरोडा विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार रविकांत बोपचे यांना अतिआत्मविश्वास नडला. परिणामी भाजपचे उमेदवार विजय रहांगडाले यांनी त्यांचा ४२ हजार मतांनी पराभव केला.

या गोष्टी ठरल्या पराभूत होण्यास कारणीभूत

- उमेदवारीवरुन सुरुवातीपासूनच असलेली धुसफूस
- प्रचाराच्या दिवसांपर्यंत पदाधिकारी कार्यकर्त्यांची मनधरणी
- महाविकास आघाडीतील स्थानिक नेत्यांमध्ये समन्वयाचा अभाव
- स्थानिक मुद्यांवर भर देऊन मतदारांवर छाप पाडण्यात अपय
- मोठ्या प्रचारसंभावर भर, मतदारसंघाच्या बांधणीकडे दुर्लक्ष
- प्रचारात ठोस स्थानिक मुद्यांचा असलेला अभाव

लाडकी लाट ठरली महत्वपूर्ण

राज्यातील महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरु करुन त्याचा थेट लाभ देण्यास सुरुवात केली. या योजनेचे पैसे लाभार्थी महिलांच्या खात्यावर जमा होण्यास सुरुवात झाली. या योजनेच्या लाभात वाढ करण्याची घोषणा महायुती सरकारने केली. त्यामुळेच विधानसभा निवडणुकीत महिला मतदानाचा टक्का वाढला. परिणामी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना पराभवाची धुळ चाखावी लागली.

जिल्ह्यातून मंत्रीमंडळात वर्णी कुणाची?

चारही आमदार मुंबईला रवाना, बडोले, रहांगडालेवर लक्ष, प्रफुल्ल पटेलांची भूमिका महत्वपूर्ण

गोंदिया: - विधानसभा निवडणुकीचा निकाल शनिवारी (दि.२३) जाहीर झाला. यात राज्यातील जनतेने महायुतीला स्पष्ट बहुमत दिले. तर जिल्ह्यातही महायुतीने विजयाचा चौकार मारत महाविकास आघाडीचे पानिपत केले. महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्याने सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. त्यात आता गोंदिया जिल्ह्यातून मंत्रीमंडळात कुणाची वर्णी लागते, याकडे जिल्हावासीयांच्य नजरा लागल्या आहेत.

विधानसभा निवडणुकीत महायुतीने घटक पक्षात साधलेले योग्य समन्वय, निवडणुकीदरम्यान प्रचाराचे केलेले सुक्ष्म नियोजन, उमेदवार बदलण्याचा निर्णय, लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुकांची पुनरावृत्ती टाळत गोंदिया, आमगाव, अर्जुनी मोरगाव आणि तिरोडा या चारही मतदारसंघातून महायुतीचे चारही उमेदवार निवडूण आणले. तर प्रथमच काँग्रेसला जिल्ह्यातून भुईसपाट करण्यात महायुतीची खेळी यशस्वी ठरली.

निवडून आलेल्या आमदारांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजीत पवार गटाचे आ.राजकुमार बडोले हे २००९,२०१४ व २०२४ असे तिनदा निवडून आले आहे. तर तिरोडा मतदारसंघाचे आ.विजय रहांगडाले हे सन २०१४,२०१९ आणि २०२४ मध्ये सलग तिसऱ्यांदा निवडून आले. त्यांनी मतदारसंघात सलग तीनदा निवडून येत विजयाची हॅटट्रीक साधली आहे. तर गोंदियाचे भापपचे आ.विनोद अग्रवाल आणि आमगावचे आ.संजय पुराम यांचा हा दुसराच टर्म आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून निवडून आलेले अर्जुनी मोरगावचे आ.राजकुमार बडोले यांच्या मागे खा, प्रफुल्ल पटेल यांचे बळ आहे. पटेल यांचा हा गूह जिल्हा असल्याने आणि जिल्ह्यावरील पकड अधिक मजबूत करण्यासाठी बडोले यांना मंत्री करण्यासाठी ते निश्चित प्रयत्न करतील यात शंका नाही. त्यामुळे बडोले यांची दुसऱ्यांदा महायुती सरकारच्या मंत्रीमंडळात वर्णी लागण्याची शक्यता आहे. गोंदिया-भंडारा जिल्ह्यात भाजपचे अनुभवी व सलग तिसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून येणारे विजय रहांगडाले यांची सुद्धा भाजपकडून मंत्रीमंडळात वर्णी लाग शकते. ते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या गुडबुकमध्ये असून, सर्वांना सोबत घेऊन चालणारा माणूस, अशी त्यांची प्रतिमा आहे. त्यामुळे दोन्ही जिल्ह्यांतील भाजपची पकड मजबूत करण्यासाठी त्यांची भाजपकडून मंत्रीमंडळात वर्णी लागण्याची शक्यता असून, जिल्ह्याच्य राजकीत वर्तुळात तशी चर्चा आहे.

गोंदियाचे आ.विनोद अग्रवाल यांनी ६१ हजार मते घेन गोंदिया विधानसभेच्या इतिहासात प्रथमच कमळ फुलविले आहे. त्यामुळे याचे बक्षीस त्यांना मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

समन्वयातूनच लागणार मंत्रीमंडळात वर्णी

या निवडणुकीत जिल्ह्यातून भाजपचे ३ आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे १, असे चार आमदार महायुतीचे निवडून आले आहेत. त्यात नव्या सरकारचा शपथ विधी सोमवारी (दि.२५) होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. गोंदिया-भंडारा जिल्ह्यातून मंत्रीमंडळात कोणत्या आमदाराची वर्णी लावायची हे महायुतीत समन्वयाने ठरणार आहे. पण यात खा.प्रफुल्ल पटेल यांच्या शब्दाला निश्चित वजन असणार आहे. महायुतीच्या उमेदवारांच्या विजयासाठी त्यांनी जिल्ह्यात घेतलेली मेहनत ही सर्वांसमोर आहे

चारही आमदार मुंबईला रवाना

आ.विनोद अग्रवाल, राजकुमार बडोले, विजय रहांगडाले, संजय पुराम हे चारही नवनिर्वाचित आमदार रविवारी (दि.२४) मुंबईला रवाना झाले. या चारही आमदारांना शनिवारी सायंकाळीच पक्ष कार्यालयातून रविवारी मुंबई येथे पोहोचण्याचा संदेश आला. त्यामुळे हे चारही आमदार रविवारी सकाळी मुंबईसाठी रवाना झाले.